नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५१ * अंक ८७ * * अमरावती * सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी...

## पाऊसग्रस्तांना जिवंत ठेवा

महाराष्ट्रातील मुसळधार पावसामुळे अर्ध्यापेक्षा जास्त महाराष्ट्र पार कोमेजून गेलेला आहे. अशाप्रकारे भिजून कोमेजलेल्या शेतकऱ्यांची जवळजवळ 70 ते 80 टक्के पिके मातीमोल झालेली आहेत. परतीचा मान्सून आणखी किती बळी घेतो याची कल्पना सुद्धा करवत नाही. सरकार स्वबळावर किती मदत देणार हा सुद्धा प्रश्न निर्माण होत आहे. आता केंद्र सरकारकडे मागणी झालेली आहे किंवा होणार आहे. महाराष्ट्र सरकार हे केंद्राच्या दृष्टीने लाडके सरकार आहे. मात्र महाराष्ट्र श्रीमंत राज्य आहे आणि याच श्रीमंतीच्या आवरणाखाली केंद्राकडून महाराष्ट्राला जेवढी मदत यायला हवी तेवढी येत नाही. तरीही राज्याचे सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. परंतु या अभूतपूर्व संकटावर सर्वपक्षीय चर्चा करणे गरजेचे आहे. याबाबतीत फक्त पक्षीय दृष्टिकोन न ठेवता सर्व पक्षांनी, सर्वच बाबींची सविस्तर चर्चा करून केंद्र सरकारला आपल्या मागण्याचा गोषवारा पाठवणे गरजेचे आहे. यासाठी सरकारने विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे अशी मागणी करण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीचा विचार करून अधिवेशन बोलावले पाहिजे असे केवळ विरोधकांचेच म्हणणे नाही. तर सत्ताधारी पक्षातीलही अनेक आमदार दबक्या आवाजात हीच मागणी करीत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आलेल्या पावसाची आणि पुराची भीषणता किती आहे ते सर्वांच्याच लक्षात येत आहे. सध्या महाराष्ट्रावर जवळपास दहा लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे, देशातील काही राज्यांच्या तुलनेत हे कर्ज डोईजड नसेल. पण आता हे कर्ज आणखी किती वाढवावे याचाही विचार करणे जास्त गरजेचे आहे. राज्याच्या एकूण जीडीपी नुसार 25% पेक्षा जास्त कर्ज घेऊ नये, असे महालेखा परीक्षक म्हणतात. सध्या अशा प्रकारे कर्ज घेणारी देशातील काही राज्ये 25% च्या वर जाऊन अगदी 40% पर्यंत कर्जात बुडालेली आहेत. पंजाब सारखे राज्य तर जीडीपीच्या 40% पेक्षा जास्त कर्ज घेऊन बसलेले आहे. परंतु महाराष्ट्राला आता जे आहे त्यापेक्षा जास्त कर्ज घेऊन राज्याचा आर्थिक समतोल साधावा लागू नये, असे सर्वसाधारण अभ्यासक लोकांचे मत आहे. आजही अनेक फुकट्या योजनांसाठी आपल्याला कर्ज घ्यावे लागते, या अशा योजना आहेत की त्या सहनही होत नाहीत आणि सांगताही येत नाहीत. मग आता प्रश्न असा उरला आहे की सध्या अति पावसाने त्रस्त असलेल्या पाऊसग्रस्त जनतेला कुठून आणि कशी मदत करावयाची. सध्या तरी मोदी साहेबांना आपल्या लाडक्या देवाभाऊंना मदत करणे गरजेचे दिसते. विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावणे त्यासाठीच गरजेचे आहे. सबंध महाराष्ट्रातून आणि सर्वात जास्त मराठवाड्यातून पाऊसग्रस्तांच्या मन हेलावून टाकणाऱ्या बातम्या येत आहेत. पावसाने अनेक अपघाती मृत्यू होत आहेत. अशा या 'अस्मानी आपत्तीवर आता केवळ सुल्तानी तोडगा' हेच एकमात्र उत्तर आहे. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस साहेबांना या भीषण परिस्थितीची कल्पना आहे. देवेंद्रजींनी यासाठीच अधिवेशन बोलावून सविस्तर मागणीपत्र म्हणजेच प्रस्ताव पत्र पाठवण्याचे त्यांना ठरवावे लागेल. या अभूतपूर्व संकटावर मात करण्यासाठी आपल्या राज्याला निश्चितच तोडगा काढणे गरजेचे आहे, त्यासाठी केंद्रावर सर्वपक्षीय मागणी पत्राचे दडपण आले पाहिजे. खरेतर हे काम मुख्यमंत्र्यांनी आधीच केलेले आहे. त्याला विधी मंडळाचे अनुमोदन जर विधानसभा अधिवेशनाच्या माध्यमातून मिळाले तर सोन्याला सुगंध आल्यासारखे होईल. हीन-दीन जनतेला आणि पाऊसग्रस्त लोकांना जिवंत ठेवणे हेच जिवंत राज्याचे लक्षण आहे, हे सर्वांनीच लक्षात ठेवावे. एवढे खासच!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# सरसकट पंचनामे करा!

### मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश : मराठवाड्यातील पूरस्थितीचा घेतला आढावा : जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २८ :**
महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. यामुळे मराठवाडा, पश्चिम विदर्भ, सोलापूर आणि उत्तर महाराष्ट्रात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

मराठवाड्यात तर अक्षरशः ओला दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पाऊस थांबण्याचे नाव घेत नाहीये. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांकडून मराठवाड्यातील सात जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला. तसेच अधिकारी वर्गाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे, विशेषतः मराठवाड्यात सर्वाधिक फटका बसला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख नेते उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे जयंत पाटील आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी हे 8 जिल्हे तसेच सोलापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांशी आज सकाळी संपर्क करुन पावसाच्या, मदतकार्याच्या स्थितीचा आढावा घेतला. प्रत्येक ठिकाणी मदतकार्यात केल्या जात असलेल्या उपाययोजना जाणून घेत त्यांना काही सूचनाही केल्या. मदत शिबिरांमध्ये भोजन, पाणी आणि आरोग्याच्या योग्य व्यवस्था राखण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

काही जिल्ह्यात चारा टंचाई असल्याने तातडीने चारा पुरवण्याचेही आदेश दिले आहेत. पावसामुळे धरणांचे विसर्ग वाढविले जात असताना नागरिकांना आधीच सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यास सुद्धा त्यांनी सांगितले आहे. सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करावे, अशाही सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.





लोकांना जास्तीत जास्त मदत करण्याची सरकारची मानसिकता आहे. सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहे. कायद्यावर आणि नियमांवर बोट ठेवून लोकांना त्रास होईल असे कोणीही वागू नका, असेही निर्देश देण्यात आले आहेत. सगळ्या नुकसानीची माहिती आमच्याकडे आल्यानंतर अधिकची काय मदर करायची, त्याचा निर्णय सरकार करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## माजी पीएम ओली यांना काठमांडू सोडण्यास मनाई

■ **वृत्तसंस्था, काठमांडू, दि. २८ :**
नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि इतर पाच जणांना काठमांडू सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. यामध्ये माजी गृहमंत्री रमेश लेखक, गृहसचिव गोकर्ण मणी दुवाडी, अंतर्गत गुप्तचर प्रमुख हट राज थापा आणि काठमांडूचे तत्कालीन जिल्हा दंडाधिकारी छबी रिजाल यांचा समावेश आहे.



जेन-झी चळवळीदरम्यान झालेल्या गोळीबाराच्या घटनेची चौकशी करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश गौरी बहादूर कार्की यांच्या अध्यक्षतेखालील न्यायिक आयोगाने हा निर्णय घेतला. आयोगाने या नेत्यांचे पासपोर्ट निलंबित करण्याचे आणि कडक देखरेखीचे आदेशही दिले आहेत. आयोगाच्या परवानगीशिवाय कोणीही काठमांडू सोडू शकत नाही, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली राजीनामा दिल्यानंतर १८ दिवसांनी शनिवारी भक्तपूर येथे पक्षाच्या विद्यार्थी संघटनेच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते, तेव्हा ते सार्वजनिकरित्या उपस्थित राहिले. बैठकीत ओली म्हणाले की, देशाला तमाशा असलेल्या सरकारच्या हातात सोडून आपण परदेशात जाऊ शकत नाही.

ओली यांनी आरोप केला की, सध्याचे सरकार लोकांच्या इच्छेने नाही तर हिंसाचार आणि तोडफोडीने बनले आहे. त्यांनी असा दावा केला की, त्यांच्या सरकारने पोलिसांना गोळीबार करण्याचे आदेश दिले नव्हते. ओली यांनी तक्रार केली की, सध्या ज्या घरात ते राहत आहेत त्या घराचा पत्ता उघड असूनही आणि हल्ल्याच्या धमक्या येत आहेत.

## दोन दहशतवाद्यांचा कुपवाड्यात खात्मा

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २८ :**
जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टरमध्ये सैन्याने दोन दहशतवाद्यांना ठार मारले. ते नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत होते. सूत्रांचे म्हणणे आहे की मृतदेह नियंत्रण रेषेच्या अगदी जवळ पडले आहेत. सीमेपलीकडून गोळीबाराच्या धोक्यामुळे कडक सुरक्षा व्यवस्थेत लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख आणि त्यांचे संबंध अद्याप जाहीर झालेले नाहीत.

गेल्या आठ दिवसांत लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये झालेली ही दुसरी चकमक आहे. यापूर्वी २० सप्टेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील उधमपूरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक जवान शहीद झाला होता. एका विशेष पोलिस अधिकाऱ्यासह (एसपीओ) दोन पोलिस जखमी झाले. दोडाच्या भादरवाह येथील दुडू-बसंतगड आणि सोजधरच्या जंगलात ही चकमक झाली. या भागात दहशतवाद्यांची सातत्याने घुसखोरी सुरू असून, भारतीय सैन्य रोखधाम करीत आहे.

## महात्मा गांधींचे कार्य देश हितासाठी : पंकज शर्मा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :**
खेड्याकडे चला, खेड्यांचा विकास झाला पाहिजे. सगळे प्रयोग महात्मा गांधीनी देशाच्या हितासाठी केलेले आहेत. सरदार पटेल यांना पंतप्रधान बनवण्याऐवजी पंडित नेहरूंना प्रधानमंत्री बनवण्यात आले असा आरोप गांधीजींवर लावण्यात आला, परंतु सरदार पटलांचे वय त्यावेळेला 72 वर्ष आणि जवाहरलाल नेहरूंचे यांचे वय 58 वर्ष होते, त्यामुळे पंडित नेहरूंना देश विकासासाठी अधिक वेळ मिळाला आणि या देशाला एक नवीन दिशा मिळाली, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, गांधी विचारांचे अभ्यासक पंकज शर्मा यांनी केले.

विदर्भ गौरव प्रतिष्ठान व प्रेस क्लब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महात्मा गांधी : कल, आज और कल' या विषयावर व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. गिरीश गांधी म्हणाले, गांधीजी एक साधे व्यक्तीमत्व होते. किती संघर्ष त्यांना करावा लागला आयुष्यभर सर्व त्यांच्या विरोधात होते. हिंदुत्ववादी विरोधात होते, आंबेडकरवादी, विरोधात होते मार्क्सवादी विरोधात होते समाजवादी, विरोधात होते इतकेच काय पण गांधीवादी विरोधात होते. या सर्व संघर्षातून गांधी टिकले. या पृथ्वीतलावर असा हाडामासाचा माणूस होऊन गेला, यांच्यावर येणाऱ्या पिढ्यांना विश्वास ठेवावा लागेल. किती लोकांनी वेगवेगळ्या प्रकारे त्यांना संपवण्याचा प्रयत्न केला आहे, मात्र गांधी कधी मरत नसतो, मरणार नाही, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक शुभदा फडणवीस यांनी केले.प्रमुख अतिथी म्हणून प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र होते. कार्यक्रमाला प्रेमबाबू लुनावत अतुल दुरगकर, रमेश बंग, दिलीप जाधव प्रदीप मैत्र, पंकज शर्मा, दिलीप जाधव उपस्थित होते. आभार निलेश खांडेकर यांनी मानले.



## पाकिस्तानचे भारताला १४७ धावांचे आव्हान

### साहिबजादा फरहानचे अर्धशतक : कुलदीपने घेतल्या ४ विकेट

■ **वृत्तसंस्था, दुबई, दि. २८ :**
आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानचा संघ संपूर्ण वीस षटके खेळू शकला नाही. १४६ धावांवर गारद झालेल्या पाकने भारतासमोर १४७ धावांचे लक्ष्य ठेवले.

धडाकेबाज सुरूवात करणारा पाकचा संघ दोनशे धावा पार करणार असे चित्र दिसत असताना भारतीय गोलंदाजांनी त्यांना थोपवून धरले. भारताकडून कुलदीप यादवने चार विकेट घेतल्या. पाकचा ओपनर साहिबजादा फरहान याने ३८ चेंडूत ५७ धावा चोपल्या.



## कोकण किनारपट्टीला 'रेड अलर्ट'

सतर्कतेचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, रायगड, दि. २८ :**
कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांना पुढील 24 तासांसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिवृष्टीच्या परिस्थितीचा तातडीने आढावा घेतला.

## दिल्ली विमानतळाला बॉम्बची धमकी

■ **नवी दिल्ली :** दिल्ली विमानतळ, विविध शाळा आणि इतर संस्थांना ईमेलद्वारे बॉम्बच्या धमक्या पाठविण्यात आल्या. दिल्ली पोलिसांनी सांगितले की सर्व ठिकाणी बॉम्ब पथके आणि श्वान पथके तैनात करण्यात आली आहेत.

## ईडी लवकरच जप्त करणार काही अभिनेते, क्रिकेटपटूंची मालमत्ता

### अनेकजण रडारवर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
ऑनलाइन बेटिंग अॅप 1 एक्स बेटच्या जाहिरातीच्या संदर्भात अंमलबजावणी संचालनालय लवकरच मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत काही खेळाडू आणि अभिनेत्यांच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता जप्त करणार आहे.

अधिकृत सूत्रांनी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, काही सेलिब्रिटींनी या अॅपद्वारे मिळवलेल्या जाहिरातींच्या पैशाचा वापर विविध मालमत्ता खरेदी करण्यासाठी केला आहे. हे गुन्ह्यांचे उत्पन्न मानले गेले आहे.

सेलिब्रिटींच्या या जंगम आणि स्थावर मालमत्ता जप्त करण्याचे आदेश ईडी लवकरच जारी करणार आहे. काही सेलिब्रिटींच्या संयुक्त अरब अमिराती (यूएई) सारख्या देशांमध्येही मालमत्ता आहेत. या मालमत्तांचे सध्या मूल्यांकन केले जात आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून, ईडीने या अॅप प्रकरणासंदर्भात क्रिकेटपटू युवराज सिंग, सुरेश रैना, रॉबिन उथप्पा आणि शिखर धवन यांच्यासह अभिनेता सोनू सूद, अभिनेत्री मिमी चक्रवर्ती (माजी टीएमसी खासदार) आणि अंकुश हाजरा (बंगाली चित्रपट) यांची चौकशी केली आहे. काही ऑनलाइन इंफ्लूएन्सरची प्रभावकांचीही चौकशी करण्यात आली आहे.

## नद्यांमध्ये पोहणे जीवावर बेतले

### चौघे वाहून गेले, एकाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २८ :**
जिल्ह्यात अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश्य पावसाने थैमान घातले आहे. हे तांडव कायम असल्याने जिल्ह्यातील नदी, नाल्यांना पूर आले असून नद्या दुथडी भरून वाहत आहेत. नांदुरा व मलकापूर तालुक्यांत आज, रविवारी संध्याकाळी आला. या तालुक्यांतील दोन स्वतंत्र घटनांत चार जण दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत वाहून गेले.

यातील एकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असून त्याचा मृतदेह हाती लागला, तर इतर तिघांचा स्थानिक शोध बचाव पथक, पोलीस यंत्रणा आणि गावकरी युद्धपातळीवर शोध घेत आहे. संध्याकाळी उशिरापर्यंत तिघांचा थांगपत्ता लागला नव्हता.

नांदुरा तालुक्यातील निमगाव येथील ज्ञानगंगा नदीत आज दुपारी करण भुमरे (१८) आणि वैभव फुके (१९) बुडाले. ते पोहण्यासाठी नदीत गेले होते, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने आणि पाण्याचा वेग जास्त असल्याने ते वाहून गेले. स्थानिक महसूल प्रशासन, पोलीस आणि स्थानिक ग्रामस्थ त्वरित घटनास्थळी दाखल झाले. सध्या बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून, नदीची पाणीपातळी वाढल्यामुळे शोधकार्यात अडचणी येत आहेत. गावकरी व प्रशासन त्यांचा शोध घेत आहे.

दुसरी दुर्घटना आज मलकापूर तालुक्यात घडली. शिवणी मार्गावरील नींबोळी गावानजीकच्या केसोबा मंदिर परिसरातील व्याघ्र नदीत पोहण्यासाठी सोहम वासुदेव सोनोने (१६, रा. दसरखेड) आणि शुभम राजू दवंगे (१४, रा. दसरखेड) गेले होते. मात्र, खोलीचा अंदाज न आल्याने ते नदीत बुडाले. याची माहिती कळताच शिवसेना (शिंदे गट) तालुका प्रमुख विजय साठे यांनी गावकऱ्यांसह नदीकडे धाव घेतली. शोधकायार्नंतर शुभमचा मृतदेह हाती लागला. सोहमचा शोध सुरू आहे. दरम्यान, पुर परिस्थितीत नदीकाठी जावू नये, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## चर्मकार समाजाची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी

### केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार : ५०५ गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :**
शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रगतीतूनच संपूर्ण चर्मकार समाजाच्या विकासाचा मार्ग सोपा होईल. त्यामुळे समाजातील प्रत्येक मातेने आपल्या मुलांना उत्तम शिक्षण देण्यावर भर द्यावा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. चर्मकार सेवा संघाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

गांधीसागर येथील शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला आ. नरेंद्र भोंडेकर, चर्मकार सेवा संघाचे अध्यक्ष भैय्या बिघाणे, भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्व. भानुताई गडकरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ५०५ गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. गडकरी म्हणाले, गेल्या १६ वर्षांपासून हा कार्यक्रम आयोजित केला जातोय. मी दरवर्षी या कार्यक्रमात उपस्थित राहतो. भैय्याजींनी १६ वर्षांमध्ये समाजातील तरुण सुशिक्षित व्हावा, उत्तम जीवन मिळावं, यासाठी अनेक उपक्रम घेतले. चर्मकार सेवा संघाने संत शिरोमणी रविदास महाराज यांना गुरू मानले आहे. महाराजांनी यशस्वी जीवनाचा मार्ग दाखवला आहे. यशस्वी जीवनासासाठी समाजाची प्रगती झाली पाहिजे, असा त्यांचा विचार होता. कै. वामनराव पै म्हणत तूच तुज्या जीवनाचा शिल्पकार. एखाद्याला आपलं जीवन बदलायचे असेल तर हे काम तो स्वतःच करू शकतो.

समाजाची शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे. डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे.

ज्ञान प्राप्त करण्यातच समाजाची प्रगती आहे. आपल्या मुलांना चांगले संस्कार, चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. समाजाची प्रगती होण्यासाठी त्यांच्या हातून उत्तम कार्य घडले पाहिजे, यासाठी सातत्याने प्रयत्न व्हावे. समाजाचा आर्थिक विकास झाला पाहिजे. समाजाला उद्योग, व्यवसायात पुढे यावे लागेल. समाजातील काही लोक उद्योजक झाले तर एकूणच समाजाचाही विकास होईल. त्याचवेळी सामाजिक विकासही होणे गरजेचे आहे, असे गडकरी यावेळी म्हणाले.

उत्तम गायक, लेखक, कवी, आपल्या समाजात घडले पाहिजे. खेळांमध्ये प्रावीण मिळविले पाहिजे. चांगला कलावंत किंवा खेळाडू कुठल्या जातीचा आहे, हे बघितले जात नाही. खेळाडूंचे कौशल्य बघितले जाते, याचाही गडकरी यांनी आवर्जून उल्लेख केला. याप्रसंगी आ. नरेंद्र भोंडेकर आणि अतिथींनी मनोगत व्यक्त केले.



# राज्याच्या अनेक भागांत मुसळधार

## नाशकात गोदावरीला पूर : दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाणी : अजिंठा लेणीतील धबधब्याला रौद्ररूप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:

संपूर्ण महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक संकटात आता आणखी भर पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने 29 सप्टेंबर रोजी राज्याला मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

विशेषतः आधीच पुरामुळे त्रस्त असलेल्या मराठवाड्यासाठी हा इशारा चिंतेचा विषय ठरत आहे. मराठवाड्यातील काही भागांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, तर उर्वरित महाराष्ट्रासाठीही हवामान विभागाने अलर्ट जारी केला आहे. रायगड जिल्ह्यासाठी आज 'रेड अलर्ट' जाहीर करण्यात आला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी हे 8 जिल्हे तसेच सोलापूर येथील जिल्हाधिकाऱ्यांशी आज सकाळी संपर्क करुन पावसाच्या, मदतकार्याच्या स्थितीचा आढावा घेतला.

छत्रपती संभाजीनगर शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले, तर झाड पडण्याच्या घटना घडल्या. महानगरपालिका प्रशासनाने दिलेल्या इशाऱ्यानंतर अग्निशमन दलाने तात्काळ मदतकार्य सुरू केले. अतिवृष्टीमुळे हर्सूल तलाव पूर्ण भरून वाहत असून, खाम नदीला पूर आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गंगापूर तालुक्यामधील लासूर येथे शिवना नदीला पूर आला आहे. यामुळे लासूर-गंगापूर रस्त्यावर असलेल्या पुलावर पाणी आले आहे. हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. गंगापूर आणि लासूर येथील संपर्क तुटला आहे. या पुरात काही बैल आणि इतर जनावरे अडकून पडली आहेत. प्रशासनाने या परिस्थितीवर लक्ष ठेवले आहे.

नाशिक जिल्ह्यातही मुसळधार पावसाने हजेरी लावली. येवला शहरात व विंचूर चौफुली परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटरमध्ये पाणी घुसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. उंदीरवाडी येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. बल्हेगाव येथे पोल्ट्री फॉर्मची भिंत कोसळून 800 कोंबड्या मृत्युमुखी पडल्या आहेत.

**सोलापूरात 4002 लोकांना वाचवण्यात आले**

पुराच्या पाण्यात अडकलेल्या वयोवृद्धासाठी अंबादास दानवे स्वतः रेस्क्यू टीम सोबत गेले

संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील हडसपिंपळगाव येथील वयोवृद्ध गणपत त्र्यंबक निघोटे पुराच्या पाण्यात शेतमळ्यात अडकले आहे. शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे स्वतः रेस्क्यू टीम सोबत जात बचाव मोहीम राबवली.



### पुरामुळे अडीच महिन्यांपासून विद्यार्थ्यांची शाळा बुडाली

गेल्या अडीच महिन्यांपासून मुसळधार पावसामुळे धाराशिव जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. शिलवडी गावाजवळून वाहणाऱ्या राम नदीला पूर आल्याने विद्यार्थ्यांचा शाळेला जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना गेल्या अडीच महिन्यांपासून शाळेत जाता येत नसल्याचा दावा करण्यात येत आहे. भूम तालुक्यातील पाठसांगवी गावातही दळणवळण तुटल्याने संतप्त शेतकऱ्याने १२० लिटर दूध नदीत ओतून दिले. कळंब तालुक्यातील संजीतपूर गावाचा संपर्क तुटल्यामुळे एका महिलेला उपचारासाठी ट्रॅक्टरमधून पाण्याबाहेर आणावे लागले. या घटनांवरून प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### नाशिकमध्ये जोरदार पाऊस, गोदावरीला पूर

दरम्यान गंगापूर धरणाच्या वरील कश्यपी आणि गौतमी गोदावरी ही धरणेही आता पूर्णपणे भरली आहे. परिणामी गंगापूर धरणातून पाणी सोडण्याशिवाय जलसंपदा विभागाला पर्याय उरलेला नाही. सध्याच्या स्थितीत आंबोली आणि वरील धरणांच्या परिसरात पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे गंगापूरमध्ये सद्यस्थितीत साडेसात हजार क्युसेक इतका इन फ्लो येत आहे. शिवाय गंगापूर धरण जवळपास 100 टक्के भरलेला असल्याने आलेल्या सर्व आऊट फ्लोला अर्थात विसर्ग सोडण्यासाठी मॅच करणे आवश्यक आहे. परिणामी गंगापूर धरणातून हळूहळू विसर्ग 7000 पेक्षा अधिक वाढविण्यात येईल. शहरातील नाले छोट्या छोट्या नद्या आणि रस्त्यावरील पाणी हे नदीला विविध मार्गाने मिसळत आहे. त्यामुळे होळकर ब्रिज आणि रामकुंड परिसरामध्ये गोदावरी नदीला मोठ्या प्रमाणावर पूर येण्याची शक्यता आहे. दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाणी आले आहे.

### बंधारे फुटले

अहिल्यानगर जिल्ह्याच्या दक्षिण भागात नऊ दिवसांत सरासरीच्या दुप्पट पाऊस झाला, या पावसाचा ७२१ गावांना फटका बसला. सीना नदीला पूर येऊन नदीपात्र एक किलोमीटर रुंदावले. पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यांतील १०० हून अधिक बंधारे व तलाव फुटले. अतिवृष्टीमुळे २ लाख ३ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले, ज्याचा फटका जवळपास २ लाख ९० हजार शेतकऱ्यांना बसला आहे. सध्या पंचनाम्यांचे काम सुरू असून, मदत व बचाव पथकांनी एक हजार लोकांना सुरक्षितस्थळी हलवले आहे.

दरम्यान, राहाता तालुक्यातील अनेक भागांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. नगर-मनमाड महामार्ग पाण्याखाली गेल्याने वाहतूक बंद झाली आहे. शिर्डीतील कालिका नगरसह अनेक भागांमध्ये घरांत पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे हाल झाले. काही ठिकाणी नवरात्र उत्सवाचे मंडप कोसळल्याचेही वृत्त आहे. शिर्डीत रात्री दोनजण ओढ्यात वाहून गेले होते, मात्र प्रशासनाने त्यांना वाचवले आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून पावसाच्या स्थितीचा आढावा

पुणे परिसरात धरण क्षेत्रातही पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असल्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीच्या पात्रात 10 हजार क्युसेकपेक्षा जास्त वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे नदीकाठच्या रहिवाशांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

एकंदरीत, सध्या संपूर्ण महाराष्ट्रात पावसाची स्थिती कायम असून, पुढील काही दिवस हीच परिस्थिती राहण्याचा अंदाज आहे. नागरिकांनी आणि प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## संकटाच्या काळात सरकार मदत करताना दिसत नाही



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांत सुरू असलेल्या अतिवृष्टीने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. यामुळे नद्यांना महापूर येऊन शेतीचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये मोठी भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी राज्यपालांना पत्र लिहून महाराष्ट्र विधानमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे.

अतिवृष्टीमुळे बीड आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. तसेच, शेतातील उभी पिके पाण्याखाली गेली असून, जमिनीची सुपीक मातीही वाहून गेली आहे. यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला असून, सरकारने तातडीने मदत जाहीर करावी अशी मागणी सर्वत्र होत आहे. राज्यातील या गंभीर परिस्थितीची दखल घेत जयंत पाटील यांनी राज्यपालांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर उल्लेख करत शेतकऱ्यांना तातडीने मदत पोहोचवण्याची मागणी केली आहे.

मी मागील काही दिवसांपासून अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या गावांना प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी करत आहे. शेतकऱ्यांवर मोठा बिकट काळ ओढावला आहे. पूराच्या पाण्यामुळे फक्त पिकं नष्ट झाली असे नाही तर शेतकऱ्यांची जमीनही खरडून वाहून गेली आहे. नुकसान इतके झाले आहे की शेतकरी वर्षभर राबला तरी परिस्थिती स्थिरस्थावर होणार नाही असे दिसते. अशा संकटाच्या काळात सरकारने भरीव मदत करणे गरजेचे आहे. पण सरकार असे करताना दिसत नाही. या विषयावर सविस्तर चर्चा व्हावी व तात्काळ निर्णय व्हावा यासाठी महाराष्ट्र विधानमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलवावे असे पत्रात म्हटले आहे.

## निफाडला कांदा उत्पादकांसाठी शिवसेनेतर्फे स्वाक्षरी मोहीम

**लासलगाव :** कांद्याच्या कोसळलेल्या भावामुळे निफाड तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणा?या सरकारचा शिवसैनिकांनी निषेध आंदोलन करत निफाड बाजार समितीत स्वाक्षरी मोहीम राबवली.

यावेळी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी निफाड बाजार समितीत युवासेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या व शिवसेना वक्त्या प्रियंका जोशी, निफाड शिवसेनेचे तालुकाप्रमुख खंडू बोडके, युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, भूषण मुळाणे, नदीम सय्यद उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झालीच पाहिजे, शेतकरीविरोधी धोरण राबविणाऱ्या सरकारचा निषेध असो, अशा घोषणांनी बाजार समिती परिसर दुमदुमून गेला होता. अनेक कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या.

यावेळी प्रियंका जोशी म्हणाल्या की, शेतकरी कवडीमोल भावाने कांदा विकत आहे. मात्र, केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. कांदा उत्पादकांना अनुदान देऊन भरीव मदत करावी, अन्यथा शिवसेना युवासेना तीव्र जनआंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी दिला. बाजार समितीत लिलावावेळी शेतकऱ्यांची स्वाक्षरी मोहीम राबवत कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्या सह्यांचे पत्र पाठवण्यात येणार आहे. यावेळी तालुकाप्रमुख बोडके पाटील यांनी कांद्याला अनुदान देण्याची मागणी करत नाफेडचा कांदा बाजारात आणल्याने भाव कोसळल्याचे स्पष्ट केले.

## पोसलेल्या गुंडांकडून हल्ला



**पुणे :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अहिल्यानगर जिल्ह्यात हल्ला झाल्याची घटना शनिवारी घडली होती. या हल्ल्याबाबत लक्ष्मण हाके यांनी पवार कुटुंबाने पोसलेले गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्याचा आरोप केला आहे. माझ्यावर हल्ला करणारा दळवी आणि त्याच्या सहकाऱ्यांचे फोटो आमच्याकडे आलेले आहेत. यांचे फोटो शरदचंद्र पवार आणि निलेश लंके यांच्यासोबत देखील आहेत. या सर्व लोकांनी जाणीवपूर्वक हल्ला केल्याचे लक्ष्मण हाके म्हणाले.

लक्ष्मण हाके पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथे ओबीसी एल्गार सभेसाठी कारने जात होते. रस्त्यात ते एकेठिकाणी नाश्ता करण्यासाठी थांबले. तेथून पुढे निघाल्यानंतर त्यांचा ताफा नगर तालुक्यातील अरणगाव लगत पोहोचला असता अज्ञात तरुणांनी त्यांची गाडी रोखून गाडीवर दगड व लाठ्याकाठ्यांनी हल्ला चढवला. त्यात त्यांच्या कारचे मोठे नुकसान झाले. घटनेवेळी लक्ष्मण हाके कारमध्येच होते. पण सुदैवाने त्यांना काहीही झाले नाही. या हल्ल्याबाबत बोलताना लक्ष्मण हाके यांनी शरदचंद्र पवार आणि निलेश लंके यांच्यासोबत असलेल्या लोकांचा हात असल्याचा आरोप केला. पवार कुटुंबाने असे गुंड पोसलेले आहेत, त्याच गुंडांनी हल्ला केला, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

## महायुतीचे मंत्रिमंडळ 'कामचोर आणि बिनकामाचे'

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:

मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून कोणतीही मदत मिळू शकली नाही. आमच्या शिवसेनेचे लोक मदत करताहेत, पण त्यांना मयार्दा आहे. आभाळ फाटलंय, जमीन वाहून गेलीये, अशावेळी पूर्ण मदत सरकारकडूनच व्हायला पाहिजे. पण सरकार क्रिकेट मॅचच्या बंदोबस्तात लागलेले आहे. आयपीएल कसे होणार? त्या बंदोबस्तात लागले आहे. शेतकऱ्यांचे त्यांना काही पडलेले नाही. देवेंद्र फडणवीसांचे मंत्रिमंडळ कामचोर आणि बिनकामाचे आहेत. सरकारने नांदेड, लातूरला जायला पाहिजे, पण मुख्यमंत्री मुंबई आणि नागपुरात काय करताय? असा तिखट सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली.



संजय राऊत यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील पूरस्थिती आणि शेतकऱ्यांवर आलेल्या संकटावरून सरकारला धारेवर धरले. यावेळी सरकारवर टीका करताना संजय राऊत यांची जीभ घसरली.

संजय राऊत म्हणाले, मराठवाडा, अहिल्यानगरचा मोठा भाग, जळगावातील काही भाग यासह राज्यात ठिकठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचे पूर्ण नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना उभे करण्यासाठी सरकारकडे काय योजना आहेत? केवळ गमबूट घालून चार तासांचा एक दौरा केला. तुमचे मंत्री, त्या-त्या भागातील पालकमंत्री कुठे आहेत? धाराशिवचे पालकमंत्री दोन टेम्पो घेऊन आणि आपले फोटो लावून एकदाच गेले. पण आता कुठे आहेत? पालकमंत्री कशासाठी नेमले आहेत? पूरग्रस्त जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना तिथे ठाण मांडून बसले पाहिजे. मुंबईला ते काय करताय? तर दांडियाला नाचत आहेत. दांडियात पुढल्या वर्षी देखील नाचता येईल. हा सामाजिक, राजकीय गुन्हा आहे. अशा मंत्र्यांना बडतर्फ केले पाहिजे.

सरकार म्हणजे निर्लज्जपणाचा कळस आहे. तुम्ही शेतकऱ्यांना काय मदत केली, हे मला दाखवा, असेही ते म्हणाले.

## मिथुन मन्हास बीसीसीआयचे नवे अध्यक्ष



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:

माजी स्थानिक क्रिकेटपटू मिथुन मन्हास यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबईतील बीसीसीआय कार्यालयात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर (एजीएम) रविवारी ही घोषणा करण्यात आली. त्यांची या पदावर बिनविरोध निवड झाली.

मन्हास जम्मू आणि काश्मीरसाठी अंडर-१५, अंडर-१६ आणि अंडर-१९ क्रिकेट खेळले. ते जम्मू आणि काश्मीरसाठी तीन वर्षे अंडर-१९ क्रिकेट खेळले. १९९५ मध्ये, त्यांनी जवळजवळ ७५० धावा केल्या आणि देशातील सर्वाधिक अंडर-१९ धावा करणारे खेळाडू बनले.

नंतर, ते जम्मू-काश्मीर संघाचे कर्णधार बनले. या कामगिरीमुळे त्यांची उत्तर विभागासाठी निवड झाली. तिथे खेळत मन्हास यांनी आपली ओळख निर्माण केली आणि ज्युनियर क्रिकेटमध्ये ते प्रसिद्ध झाले. १९९६ मध्ये, त्यांची रणजी ट्रॉफीमध्ये दिल्ली संघात निवड झाली. तथापि, ते एकही सामना खेळले नाही.

## मी कामाचा माणूस, जातीपातीचा विचार केला नाही...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:

बारामती सहकारी बँकेवरून ओबीसी समाजाचे नेते आणि आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केलेल्या आरोपांनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतून हाकेंना थेट प्रत्युत्तर दिले.

हाके यांनी काही दिवसांपूर्वी बारामतीतील ओबीसी मोर्चामध्ये, या बँकेतून मराठा समाजाला अण्णासाहेब महामंडळातून मोठ्या प्रमाणावर कर्ज मंजूर होत आहे असा आरोप केला होता. या आरोपावर भाष्य करताना अजित पवार म्हणाले, कोणीतरी येतं आणि अर्धवट माहिती घेऊन भाषण करतो. खरं तर माध्यमांनी त्यांच्या वक्तव्याखाली टिप टाकावी लागेल. कारण वस्तुस्थिती तशी नाही. मी कधीही जातीपातीचा विचार केलेला नाही. ठराविक समाजाला कर्ज मिळावं, इतरांना वंचित ठेवलं जावं, असं कधीच आमच्या मनात येत नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.



अजित पवार यांनी सभेत आपल्या कामकाजाची उदाहरणे देत उपस्थितांना थेट विश्वास दिला. ते म्हणाले, आज बारामतीसाठी दोन कोटी रुपये मंजूर केले. बारामती शाळेसाठी काही निधी उपलब्ध केला. उर्दू शाळेला साडेचार कोटींची मदत मंजूर केली. सकाळी सहा वाजता उठून काम करतो. कालझपरवा दुपारी जेवायलाही वेळ मिळाला नाही. कारखान्यात जे मिळेल ते खातो आणि पुन्हा कामाला लागतो.

आजच मी वेगवेगळ्या कामांसाठी बारामतीत 25 कोटींची तरतूद केली आहे. कामाच्या बाबतीत माझा हात कुणी धरू शकत नाही. मी कामाचा माणूस आहे. पवारांच्या या भाषणावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

आपल्या भाषणात अजित पवारांनी बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या काही योजनांची माहिती दिली. बारामती एमआयडीसी परिसरात 78 कोटी रुपयांच्या स्टेडियमला मंजुरी दिली आहे, असे त्यांनी यावेळी ठासून सांगितले.

## साहित्य परिषदेच्या सभेत गोंधळ



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) सर्वसाधारण सभेत प्रचंड राडा झाल्याचे पाहायला मिळाले.

साहित्य परिषदेचे आजीव सभासद राजकुमार दुरगुडे पाटील यांनी कार्यकारिणीच्या निवडणुका होत नसल्याबाबत निषेध नोंदवण्यासाठी सभागृहात येण्याचा प्रयत्न केला. मात्र, मिलिंद जोशी यांच्या गटातील कार्यकर्त्यांनी त्यांना सभागृहात प्रवेश नाकारला आणि बाहेर काढून दरवाजा बंद केला. यावेळी भानुदास धुरगुडे यांना धक्काबुक्की झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे या सभेत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

राजकुमार धुरगुडे यांनी यापूर्वीच मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखालील गटाविरोधात धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. मसापच्या नावाने अशा प्रकारे बैठक घेण्याचा त्या गटाला कोणताही अधिकार नसल्याचा आरोप आहे. परिषदेचे कामकाज हा स्वयंघोषित गट बेकायदेशीररीत्या चालवत असून त्यांनी जबरदस्तीने मसाप कार्यालयाचा ताबा घेतला आहे, असा आरोप धुरगुडे यांनी केला.

**कलम 41 अ अंतर्गत तक्रार**

या संदर्भात धुरगुडे यांनी कालच धमार्दाय आयुक्त कार्यालयात कलम 41 अ अंतर्गत औपचारिक तक्रार नोंदवली. आज सकाळीच त्यांनी मसाप कार्यालयात ही तक्रार सादर करून अनधिकृत गटाला बैठक घेण्यास मज्जाव करावा, अशी मागणी केली होती.

त्याचाच संदर्भ देत धुरगुडे सभागृहात घोषणाफलक घेऊन शांततेच्या मार्गाने आपला निषेध नोंदवण्यासाठी आले होते. मात्र, सभागृहातील कार्यकर्त्यांनी त्यांना प्रवेशबंदी केली. त्यांना जबरदस्ती बाहेर काढून दरवाजा बंद करण्यात आला. परिणामी, वातावरण आणखी तापले आणि सभेत शाब्दिक चकमकीसह धक्काबुक्की झाली.

या संपूर्ण घटनेनंतर मसापच्या सभेच्या कार्यवाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यकारिणीच्या निवडणुका न घेता, परिषदेचे कामकाज अनधिकृत गट चालवत असल्याच्या आरोपामुळे सभासदांमध्ये संभ्रम व नाराजी वाढली आहे. धमार्दाय आयुक्तांकडे धुरगुडे यांनी केलेल्या तक्रारीवर काय निर्णय होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आर्ट बाजारात भारतीय कलाकारांचे वर्चस्व

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:

दिल्लीतील एका बागेत भगवान बुद्धांची एक प्रचंड मूर्ती उभी आहे...पण त्यांचे डोळे शांत नाहीत, विस्मयकारक आहेत.बारकाईने पाहिले तर तुम्हाला दिसेल की त्यांचा चेहरा भांडी, तवे आणि स्वयंपाकघरातील भांड्यांपासून बनलेला आहे.

ही कलाकृती कलाकार सुबोध गुप्ता यांची आहे. दैनंदिन वस्तूंचा वापर कलेसाठी करण्याचे त्यांचे कौशल्य आता आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिध्वनित होत आहे.



ही मूर्ती शालिनी पासी यांच्या घराच्या बागेला सजवते. त्यांच्या घरात हुसेनच्या चित्रांपासून ते व्हिडिओ प्रतिष्ठापनांपर्यंत एक लहान संग्रहालय होईल इतपत कलाकृती आहेत. कला बाजार केवळ दिल्लीतच नाही तर मुंबई आणि बंगळुरूसारख्या महानगरांमध्येही तेजीत आहे. लिलाव घरे (ऑक्शन हाऊस), गॅलरी आणि संग्राहक म्हणताहेत की भारतीय कलेचा दबदबा तयार झाला आहे. ऑनलाइन कला बाजारपेठ आर्टसीनुसार, २०२४ मध्ये भारतीय कलाकारांची मागणी सर्वात वेगाने वाढली आहे.

मार्चमध्ये, एम.एफ. हुसेन यांचे एक चित्र १२२ कोटी रुपयांना विकले गेले. हा एक विक्रम आहे. सोथबी ३० सप्टेंबर रोजी एफ.एन. सूझा यांच्या कलाकृतींचा लिलाव करत आहे. हाऊसेस इन हॅम्पस्टेड आणि एम्परर सारख्या कलाकृतींचे मूल्य ८० कोटी ते ९५ कोटी इतके आहे.

दिल्लीस्थित गॅलरीस्ट रोशिनी वधेरा म्हणतात, देशांतर्गत बाजारपेठ मजबूत आहे आणि त्यामुळेच किमती वाढत आहेत. भारतीय कलाकृतींची मागणी परदेशातही वाढत असून, खरेदीदारांची गर्दी वाढत आहे.

महासागर
सोमवार, दि. 29 सप्टेंबर 2025
अमरावती
पान 3

# पेढी नदीच्या पात्रात आढळला तरुणाचा मृतदेह

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 28)** – भातकुली पोलिस स्टेशनच्या हद्दीतील चाकुर शिवार स्थित पेढी नदीच्या पात्रात अनोळखी युवक मृत अवस्थेत आढळून आला आहे. याप्रकरणात तपास अधिकारी एएसआय राजेश बोरकुटे तपास करत आहेत. मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

फिर्यादी पोलीस पाटील सुनिल वामनराव बांगरे (वय 47, चाकुर) यांनी दिलेल्या माहितीनुसार मृतदेह सापडलेला युवक अंदाजे 25 ते 30 वर्षांचा आहे. त्याच्या अंगावर काळ्या रंगाचे फुलबाह्याचे शॉर्ट आणि निळ्या रंगाचा जीन्स पॅन्ट होता. गळ्यामध्ये काळा रगांचा धागा बांधलेला होता. मृतदेहाच्या अंगावर इतर कुठलेही कपडे किंवा दुखापत करण्याची चिन्हे दिसून आलेली नाहीत. सदर युवकाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी स्थानिक नागरिकांकडून माहिती मागितली आहे. मृतदेह सध्या भातकुली पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित जिल्हा सामान्य रुग्णालयातील गृहात ठेवण्यात आला आहे. भातकुली पोलिसांनी माहिती दिली आहे की, मृत युवकाबाबत कोणालाही काही माहिती असल्यास पोलिसांशी त्वरित संपर्क साधावा. यासाठी पोलीस पाटील सुनिल बांगरे यांचा 9158617471हा क्रमांक देण्यात आला आहे.

# मेळघाटात आणखीन एका मातेचा मृत्यू


## मेळघाटात माता मृत्यूची सत्र सुरूच

## मेळघाटात स्त्री रोग तज्ञ व बालरोग तज्ञांची गरज

महासागर | मारोती पाटणकर

**चुरणी, (दि. 28)** – मेळघाटातील माता मृत्यूचे सत्र थांबायचे नाव घेत नाही. आज रविवारी (दि.28) आणखीन एका मातेचा मृत्यू झाला. ही माता चिखलदरा तालुक्यातील सरवारखेडा येथील रहिवासी असून हतरु प्राथमिक आरोग्य आरोग्य केंद्रांतर्गत हे गाव येते या मातेचे नाव वनिता गजा धिकार (वय 22) असे असून या महिलेची 25 सप्टेंबर रोजी प्रसूती झाली होती.

मेळघाटात बाल मृत्यू व माता मृत्यू सत्र सुरूच असताना मेळघाटात स्त्री रोग तज्ञ व बालरोग तज्ञांच्या डॉक्टरांची मोठ्या प्रमाणात गरज असून सुद्धा आरोग्य विभागा मार्फत मेळघाटातील गावांमध्ये तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती प्रशासना मार्फत करण्यात येत नाही. अजूनही प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञांची गरज असूनही त्या ठिकाणी ही नियुक्ती करण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी स्त्री रोग तज्ञांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, मात्र ती अजूनही आपल्या कर्तव्यावर पोहोचलेले नाहीत, अशी भयावह परिस्थिती असूनही आरोग्य



विभागाचा मेळघाटकडे दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत माता मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. मृत वनिता ला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल करण्यात आले होते, प्रसूती नंतर काल शनिवारी तिला सुटी झाली होती. परंतू रविवारी अचानक प्रकृती खालवून वनिताचा मृत्यू झाला. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. मेळघाटात बालमृत्यूचे व माता मृत्यूचे सत्र सुरू असून महाराष्ट्र आरोग्य विभाग अजूनही गंभीर दिसत नसल्याचे स्पष्ट आहे. मेळघाटातील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्त्री रोग तज्ञ व बाल रोग तज्ञ अजूनही सेवा देत नसल्याची गंभीर बाब समोर आली असून याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे.

### सिकलसेलचा आजार

वनिता गजा धिकार असे या महिलेचे नाव असून ही माता सिकलसेल पॉझिटिव्ह होती. दोन दिवसाआधी या महिलेला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात रक्त चढवले होते व स्त्री रोग तज्ञ यांनी त्यांची तपासणी सुद्धा केली होती. तिचा मृत्यू कशामुळे मृत्यू झाला हे कारण स्पष्ट व्हायचे आहे, अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर चंदन पिंपळकर यांनी दिली.

# एकलविहीर येथील शेतकऱ्याची आत्महत्या

## शेती कर्जाला कंटाळून उचलले आत्मघातकी पाऊल

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि.28)** – तालुक्यातील एकलविहीर येथील शेतकरी सिद्धार्थ ढोके (वय 38) यांनी शेतीकर्जाच्या जाचाला कंटाळून काल गावाजवळील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ ढोके हे आपल्या आई-वडील, पत्नी व तिन्ही मुलींवर आधारलेले होते. त्यांची मुलगी एक 11 वी, एक 9 वी तर धाकटी 3रीत शिकत आहे. घरातील तेच एकमेव कमावते असल्याने त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. यावर्षी पिकांवर रोगराई, हवामानातील अनिश्चितता व वाढत्या शेती खर्चामुळे ढोके यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. शेतीमाल विक्रीतून फारसा फायदा झाला नाही, उलट कर्जाचा बोजा वाढत गेला. या आर्थिक विवंचनेतून त्यांनी टोकाचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मृतकाचे शवविच्छदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला व आज दुपारी शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर एकलविर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे. गावकऱ्यांनी शासनाने तातडीने या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, तसेच शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शैक्षणिक गरजांची जबाबदारी उचलावी, अशी मागणी केली आहे.

# एका दिवसात दुचाकी, चारचाकी चोरी

## अमरावतीत वाहनचोरीच्या घटना वाढल्या

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, (दि. 28)**– शहरात वाहनचोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. 27 सप्टेंबर रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी दुचाकी व चारचाकी वाहन चोरीला गेल्याच्या तक्रारी कोतवाली पोलिसांकडे दाखल झाल्या आहेत.

पहिल्या प्रकरणात सागर मनोहरराव देशमुख (39, रा. कॉटन ग्रीन कॉलनी नं. 02) यांनी जयस्तंभ चौक परिसरात आपली दुचाकी लॉक करून पार्क केली होती.

कामानिमित्त बाजारात जाऊन परत आल्यावर दुचाकी संबंधित ठिकाणी न मिळाल्याने त्यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली. तर दुसऱ्या घटनेत संतोष भिमराव कोलटेके (47, रा. नवसारी, नवोदय विद्यालय) यांनी स्वत:च्या नावावरील पांढऱ्या रंगाची सॅन्ट्रो कार मानस हॉस्पिटलजवळ उस्मानिया मशीद भिंतीलगत पार्क करून ठेवली होती. रात्री 11.15 वाजता हॉस्पिटलमधून परत आल्यावर कार चोरीस गेलेली आढळली. आसपास शोध घेतला, मात्र ती मिळाली नाही. या दोन्ही प्रकरणी कोतवाली पोलिसांनी गुन्हे नोंदवून तपास सुरू केला आहे. वाहनचोरांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# दुचाकीच्या डिक्कीतून 50 हजारांची रोकड लंपास

**अमरावती, (दि. 28)** – शहरातील राजापेठ भागात दुचाकीची डिक्की फोडून 50 हजार रुपयांची रोकड चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन तरुण आरोपींची हालचाल स्पष्टपणे दिसून आल्याने पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी रितेश महेश छाबळा हे किचन 365 हॉटेल व्यवसाय चालवतात. 27 जानेवारी रोजी त्यांनी 50 हजार रुपये आपल्या ॲक्टिव्हा मोपेड दुचाकीच्या डिक्कीत ठेवले. त्यानंतर मित्रासह नाश्ता करण्यासाठी गल्लीत गाडी उभी केली होती. नाश्ता करून आल्यानंतर डिक्की उघडून पाहिली असता त्यातील रोकड गायब झाल्याचे लक्षात आले. घरी परतल्यानंतर दुसऱ्या दिवशी शंकर चद्दीराम शेर यांच्या घरावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली असता, दोन तरुणांनी ॲक्टिव्हाची डिक्की तोडून रोकड खिशात घालताना दिसून आले.

# मुर्हा देवी यात्रेत बालिकेचा विनयभंग

**अमरावती** – अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मुर्हा देवी येथे रविवार 28 सप्टेंबर रोजी दुपारी 3=30 ते 4=30 वाजता दरम्यान 9 वर्षीय अल्पवयीन बालिकेचा विनयभंग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. बालिका मुऱ्हा देवीचे यात्रेत जंपिंग झूल्यावर खेळायला गेली होती. जम्पिंग झुला चालवणारा आरोपी नामे सय्यद खलील सय्यद कलाम (वय 48 वर्ष रा.सुर्जी ता. अंजनगाव) यांने या मुलीला बाजूलाच असलेल्या कटला ऑटो मध्ये नेऊन तिचे चुंबन घेऊन विनयभंग केला. अशी तक्रार रहिमापूर पोलिसांनी मिळाली. या तक्रारीच्या आधाराव पोलिसांनी तत्काळ दखल घेत कलम 74, 75(1), 75(2) भारतीय न्याय संहिता तसेच कलम 8,12 पोक्सो कायद्याप्रमाणे तत्काळ गुन्हा नोंद करून आरोपी नामे सय्यद खलील सय्यद कलम यास त्वरित ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. गुन्ह्याचा तपास रहिमापूर पोलीस करत असून या संबंधात कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे पोलिसातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

# विहिरीत पडल्याने इसमचा मृत्यू

महासागर | प्रतिनिधी

**तळेगाव दशासर, (दि. 28)**– तळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील देवगाव येथील 45 वर्षीय गजानन शंकर ढवले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. गजानन आपल्या कुटुंबासह देवगाव येथे राहत होता. शुक्रवारी दुपारी तो घराबाहेर गेला आणि त्यानंतर त्याचा काहीही शोध लागला नाही. गजाननला दारू पिण्याची सवय असल्यामुळे, कुटुंबीयांनी रात्री उशिरापर्यंत त्याची वाट पाहिली; मात्र तो परत आला नाही. शनिवारी सकाळी दहा वाजता गावालगत गजानन मोरे यांच्या शेतात एक इसम पडलेला असल्याचे गावकऱ्यांना आढळले. ही व्यक्ती गजाननच असल्याचे घरच्यांनी ओळखले. त्यांनी तात्काळ तळेगाव पोलीस स्टेशनमध्ये माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहोचून गावकऱ्यांच्या मदतीने गजानन यांची बॉडी बाहेर काढली, पंचनामा केला आणि त्यानंतर पोस्टमार्टमसाठी धामणगाव रेल्वे येथे पाठवली. पोलीसांनी आकस्मित मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे, परंतु ही घटना आत्महत्या आहे की घातपात, हे अद्याप निश्चित झालेले नाही.

# बालविवाहातून अल्पवयीन मुलगी गर्भवती

**अमरावती**– बालविवाहानंतर झालेल्या लैंगिक शोषणामुळे एक अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली. याप्रकरणात चिखलदरा पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक शुंभागी ठाकरे यांच्या तक्रारीवरून एका महिलेसह तिघांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पाल्याचे वय कमी असतानाही तिचा बालविवाह लावण्यात आला. त्यामुळे पतीने तिच्याशी शारिरिक संबंध प्रस्थापीत केले. परंतू यामधून ती गर्भवती राहीली. ही बाब 25 सप्टेंबर रोजी गर्भपातानंतर उघडकीस आली.

# सासरच्या मंडळींकडून विवाहितेला मारहाण

**अमरावती**– वरूड गावातील 30 वर्षीय महिलेस घरगुती वादातून सासरच्यांनी मारहाण केली. ही घटना 27 सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणात महिलेच्या तक्रारीवरून वरुड पोलिस ठाण्यात आरोपी योगेश महादेव दातीर (38), महादेव दातीर व दोन महिलांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादीने सांगितले की, तिचे लग्न योगेश महादेवराव दातीर यांच्याशी 8 वर्षांपूर्वी झाले असून, त्यांना एक 8 वर्षांचा मुलगा आहे. सुरुवातीला पतीने चांगले वागविले, मात्र नंतर तिची सासू-सासरे व ननंद या घरात त्रास देऊ लागल्या. या वादातून त्यांनी बेडरूममध्ये बंद करून मारहाण केली.

# झिलांगपाटी सीसी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे


## बोटाने काढता येते काँक्रीट ■ ठेकेदाराच्या भ्रष्टाचारावर सरपंचांचा गंभीर आरोप

महासागर प्रतिनिधी

**धारणी, (दि.28)**– मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत झिलांगपाटी परिसरात नुकत्याच झालेल्या सीसी रोडच्या (सिमेंट काँक्रिट रोड) कामात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. तातरा ग्रामपंचायतीचे सरपंच बिसुलाल दहीकर यांनी व्हिडिओद्वारे रस्त्याच्या निकृष्ट दर्जाचा पर्दाफाश करत ठेकेदारावर गंभीर आरोप केले आहेत.

सदर व्हिडिओमध्ये दिसून येते की, काम पूर्ण होताच रस्त्यावर पाणी साचू लागले. योग्य निचरा व्यवस्था न केल्याने हे पाणी नागरिकांच्या घरात शिरले. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी स्वत: रस्त्याचा काही भाग फोडून पाणी बाहेर काढावे लागले. रस्त्याचा काही भाग फोडल्यानंतर धक्कादायक वास्तव समोर आले. सिमेंट काँक्रिट रस्त्याखाली बेड किंवा बेसचा थर नसून थेट मातीवर सिमेंट टाकण्यात आल्याचे आढळले. एवढेच नव्हे तर, सिमेंटचे थर इतके कमकुवत आहेत की ते हात लावताच किंवा छोटासा दगड मारताच सहज उखडून पडत आहेत. या कामात लोखंडी सळयांचा वापर नाही. वापरलेले सिमेंट निकृष्ट दर्जाचे आहे. हे काम पूर्णपणे भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे, असा आरोप सरपंच बिसुलाल दहीकर यांनी केला. त्यांनी या कामासाठी ठेकेदाराला थेट जबाबदार धरले.





### कारवाईची मागणी


या निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात ग्रामपंचायतीने तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि रस्त्याचे काम त्वरित उच्च दर्जाचे करून घ्यावे, अशी मागणी सरपंचांनी केली आहे.

# चांदूर रेल्वे तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी 13 कोटी 43 लाखांची मदत

## हेक्टरी साडे आठ हजारांची मदत

## 19 हजारावर शेतकरी बाधित





महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 28)** – राज्यात जून ते ऑगस्ट या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानी पोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी नुकतीच शासनस्तरावरून मदत जाहीर झाली आहे त्यात चांदूर रेल्वे तालुक्यासाठी एकूण 13 कोटी 43 लाख 91 हजार 630 रुपयाची मदत प्राप्त झाली असून प्रति हेक्टर साडे आठ हजार रुपयाप्रमाणे लवकरच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

तालुक्यात सुरवातीला समाधान कारक पाऊस सुरू असतांना पीक ऐन बहरत असतांना ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे स्वप्न पावसात वाहून गेले. उरले सुरले पीक आता कापणीला आले असतांना पुन्हा पावसाचा जोर वाढल्याने तेही हातचे निसटले आहे, राज्यभर शेतकऱ्यांच्या आक्रोश पाहता शासनाने लगेच मदत घोषित केली आहे. त्यानुसार दसऱ्याच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत पोहचणार असल्याची माहिती आहे. तालुक्यात एकूण 19 हजार पाचशे दहा इतके शेतकरी अतिवृष्टी बाधित झाले असून शेतीचे क्षेत्रफळ 15 हजार 810 असे आहे. तालुक्यातील सातेफळ, पळसखेड, घुईखेड, चांदूर रेल्वे, व आमला विश्वेश्वर हे पाचही मंडळे अतिवृष्टी धारक असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत पोहचणार असल्याचे तहसील कार्यालयातून माहिती मिळाली आहे.

### आमला विश्वेश्वर मंडळाला सर्वाधिक फटका

यामध्ये कापूस, तूर, सोयाबीन या मुख्य पिकांचा समावेश आहे. त्यात कापूस पिकाचे 1642 हेक्टर, तुरीचे 500 हेक्टर नुकसान झाले आहेत तर सर्वाधिक फटका सोयाबीन पिकाला बसला असून त्याचे क्षेत्रफळ 13 हजार 668 इतका आहे. यात सर्वाधिक फटका आमला विश्वेश्वर मंडळात बसला असून त्या पाठोपाठ चांदूर रेल्वे मंडळाला बसला आहे.

### आ. प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहेत. आ. प्रताप अडसड यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरवठा केला होता व त्यालाच यश आले आहे. पुढे येणारे सण – उत्सव पाहता तातडीने शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे होते. तेच पाहून शासनाने तातडीने मदत जाहीर केली असून लवकरच ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. यासाठी आम्ही आमदार प्रताप अडसड आणि राज्याचे मुख्यमंत्री यांचे आभार मानतो.

**विवेक चौधरी, तालुकाध्यक्ष भाजप**

# महावितरणच्या निष्काळजीपणामुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू

## अमरावती एमआयडीसीतील सावर्डी फीडरवर दुर्घटना

## ऑपरेटरविरोधात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 28)** महावितरणच्या निष्काळजी व हलगर्जी कामकाजामुळे एका तरुण कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. वैभव इंगळे असे मृताचे नाव आहे. ही दुर्घटना 27 जानेवारी रोजी नांदगाव पेठ हद्दीतील एमआयडीसीच्या सावर्डी फीडर येथे घडली.

फिर्यादी महेश हरीभाऊ तायवाडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, वैभव इंगळे (25, रा. शेवती जहागिर) हा फिर्यादीचा मित्र असून, एम.एस.ई.बी. कार्यालय नांदगावपेठ येथे खाजगी नोकरी करीत होता. 27 रोजी वैभव इंगळे हा सावर्डी फीडरवर काम करत असताना, ऑपरेटर सुनिल हरीभाऊ अडीकने (54, रा. गुरुकृपा कॉलनी, रहाटगाव) यांच्या निष्काळजीपणामुळे बंद केलेला विद्युत प्रवाह अचानक सुरू करण्यात आला. अचानक आलेल्या प्रवाहामुळे वैभव इंगळे याला जोरदार शॉक बसला व तो जागीच मृत झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच नांदगावपेठ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. फिर्यादीच्या जबाबावरून आरोपी ऑपरेटर सुनिल अडीकने यांच्या विरोधात नांदगावपेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 106(1) तथा भादंवि 304(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ८८ लाखाचा एच १ बी व्हिसा, धडा काय घेणार?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारताच्या हात धुवून मागे लागले आहेत. भारत पाकिस्तान युध्द आपण थांबवले असा दावा करण्यापासून भारतावर ५० टक्के आयात कर लादण्यापर्यंत त्यांनी भारत विरोधी निती राबवायला सुरूवात केलेली दिसते. अमेरिका फर्स्ट हे त्याचे धोरण आहे. पण ते राबवताना भारताला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. ट्रम्प यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करून अमेरिकेत नोकरीसाठी येणाऱ्या कुशल व तज्ञ भारतीयांना जबरदस्त झटका दिला आहे. नव्या आदेशानुसार एच वन बी व्हिसा चे शुल्क पूर्वी सहा लाख रूपये होते ते आता एक लाख़ डॉलर्स म्हणजेच ८८ लाख रूपये झाले आहे. अमेरिकेत जाऊन नोकरी करू इच्छिणाऱ्या तरूणांवर हा आदेश म्हणज मोठा आघात आहे. भारतातील डॉक्टर्स, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, आयटी क्षेत्रातील इंजिनिअर्स व तज्ञ वर्षानुवर्षे मोठ्या संख्येने एच वन बी व्हिसा मिळवून अमेरिकेत नोकरीच्या निमित्ताने जात आहेत, त्यांच्यावर ट्रम्प सरकारचा नवा आदेश म्हणजे त्यांच्या भविष्यावर अमेरिकेने चालवलेली कुऱ्हाड आहे. या सर्व हजारो बुध्दीमान भारतीय तरूणांच्या अमेरिकेत जाऊन करिअर करण्याच्या स्वप्नावर ट्रम्प सरकारने पाणी ओतले आहे.

दरवर्षी अमेरिका जेवढे एच वन बी व्हिसा मंजूर करते त्याचा सर्वाधिक म्हणजेच ७० ते ७३ टक्के लाभ भारतीय नागरिकांना मिळत आलेला आहे. सन २०२४ मधे एक लाखापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना अमेरिकेने एच वन बी व्हिसा मंजूर केला होता. सन २०२४ मधे ही संख्या घटली व ७१, २१९ भारतीयांना एच वन बी व्हिसाचा लाभ मिळाला. यावर्षी २०२५ मधे आजवर ६४ हजार भारतीयांना एच वन बी व्हिसा मंजूर झाला आहे. गेल्या दोन तीन वर्षात नोकरीसाठी अमेरिकेत येणाऱ्या भारतीयांना व्हिसा देण्याचे प्रमाण अगोदरच घटले आहे. आता या व्हिसाचे शुल्क भरमसाठ वाढविल्यामुळे नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांचा ओघ निश्चितच थांबेल किंवा खूपच कमी होईल.

सहा लाखावरून थेट ८८ लाख अशी व्हिसा शुल्कात भरमसाठ वाढ केल्याने भारतीय तरूणाचे व्हिसा शुल्क भरणाऱ्या अमेरिकन कंपन्याही हबकल्या आहेत. एवढे मोठे शुल्क ते भरण्याची तयारी दाखवतील का, हा कळीचा मुद्दा आहे. भारतीय कुशल तज्ञांची, तंत्रज्ञांची व इंजिनिअर्सची संख्या घटली तर अमेरिकन कंपन्यांच्या कारभारावरही परिणाम होईल व या व्हिसा वाढीचा अर्थव्यवस्थेवरही परिणाम होऊ शकतो. कमी वेतनात कुशल तंत्रज्ञ म्हणून भारतीय नागरिक उपलब्ध होतात म्हणून अमेरिकेत भारतीय तरूणांना मोठी संधी मिळत होती. गेली काही दशके भारतीय नागरिकांनी सिलिकॉन व्हलीमधे मोठे स्थान निर्माण केले होते. आता भरमसाठ व्हिसा शुल्कामुळे अमेरिकेत जाऊ इच्छिणारे भारतीय तरूण देशात राहूनच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय नि आयटी क्षेत्रात सेवा करणार की ऑस्ट्रेलिया, युके, कनडा आणि युरोपकडे धावणार ?

अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क हे भारतावर ट्रम्प सरकारने लादलेले नवे संकट आहे.



राष्ट्रनामा

सुकृत खांडेकर

०९५९४२२४०००

sukritforyou@gmail.com

या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. कुशल तंत्रज्ञ व बुध्दीवंताना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्ट अप किंवा मेक इन इंडियामधे उतरावे लागेल. भारतीय सॉफ्ट वेअर सेवेची निर्यात सध्या १५८ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. येत्या पाच वर्षात ती २०० अब्ज डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेत बोलावून नोकऱ्या देण्याऐवजी भारतातूनच आयटी सेवा घेणे अमेरिकन कंपन्यांनी ठरविले तर आयटी व सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रात भारताची मोठी प्रगती होऊ शकते. अमेरिकेतील कंपन्यांना भारतात राहून सेवा देणाऱ्या इंजिनिअर्स व तंत्रज्ञांची कमी खर्चात चांगली सेवा मिळू शकेल व भारताचीही वेगाने भरभराट होऊ शकेल. पूर्वी नोकरीसाठी भारतीय तरूण अमेरिकेत गर्दी करीत होते, पण व्हिसाच्या भरमसाठ शुल्कामुळे ते भारतात राहुनच स्टार्ट अप सेवा सुरू करू शकतील. भारतात रोजगार वाढेल व भारतात राहुन जागतिक स्तरावर सेवा देऊन भारतातील तरूणांना चांगले उत्पन्न मिळू शकेल. जागतिक सेवा देण्यासाठी उत्तम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनाही देशात चांगली संधी मिळू शकेल.

भारतातून जागतिक स्तरावर आयटी व सॉफ्टवेअर सेवा देण्यासाठी उत्तम वातावरण असले पाहिजे. स्वच्छ व निरोगी परिसर पाहिजे. उत्तम वेतन व दर्जेदार सेवा देता आली तरच भारतीय तरूणांना स्पर्धेत टिकून राहता येईल. सरकारी कामातील लाल फितीचा कारभार आणि सर्व स्तरावर बोकाळलेला भ्रष्टाचार व कामचुकारपणा असेल तर जागतिक स्पर्धेत आपण कसे टिकाव धरू शकाणार ? काम न करता वेतन किंवा मोबदला मिळाला पाहिजे आणि जास्तीत जास्त सेवा फुकट मिळाल्या पाहिजेत ही मानसिकता दूर होणे सर्वात महत्वाचे आहे. राजकीय नेत्यांच्या मागे चकरा मारणे आणि सरकारी नोकरशहांची मनधरणी करणे या गोष्टी कायमच्या बंद होणे गरजेचे आहे. विदेशात जशी सुसज्ज व अद्ययावत असतात तशी कार्यालये देशात राज्या राज्यांत उपलब्ध झाली पाहिजेत. महत्वाच्या मोठ्या शहरांत सुसज्ज ग्रोथ सेंटर्स उभारली पाहिजेत. वीज व पाणी पुरवठा अखंड पाहिजे, इंटरनेट सेवा उत्तम असली पाहिजे. संशोधनासाठी सुविधा व कॉर्पोरेट वातावरण स्पर्धेसाठी गरजेचे आहे. कर आकारणी व कंपन्यांसाठी असलेलेले कायदे व नियमावली गुंतागुंतीचे नसावेत याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. अन्य कोणत्याही देशांपेक्षा भारतात टलेन्ट मुबलक आहे, भारतीय नागरिक प्रामाणिकपणे व चांगली गुणवत्ता देणारे काम करतात हे जगाला ठाऊक आहे. भारतीय कंपन्यांकडे विदेशातून अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होईल असे वातावरण निर्माण झाले तर भारत जागतिक पातळीवर आयटी व सॉफ्टवेअर सेवा देण्यात अग्रेसर राहिल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा स्वदेशीचा पुरस्कार करायला सुरूवात केली आहे. मेक इन इंडिया, मेड इन इंडिया, स्ट्यूट अप इंडिया, कौशल विकास योजनांना आता गती देणे गरजेचे आहे. नोकरशहांच्या आणि सरकारी फायलींच्या विळख्यात या योजना अडकून राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. उद्योग, तंत्रज्ञान व आयटी सारखी मंत्रालये त्याची माहिती व ज्ञान व कामाची आवड असलेल्या मंत्री व सचिवांकडेच दिली पाहिजेत. संशोधन, विकास व उद्यमशीलता यांना प्रोत्साहन दिले तर आपला देश आंतरराष्ट्रीय पातळीवर टलेट हब म्हणून ओ्ळखला जाईल. अमेकित जाऊन अब की बार ट्रम्प सरकार अशा घोषणा देऊनही भारताच्या काय पदरी पडले हे सर्व जगाने बघितले आहे. आता हळहळ करण्याऐवजी टम्प सरकारने लादलेल्या संकटातून सोने कसे निर्माण करता येईल यावर सरकार आणि खाजगी क्षेत्राने लक्ष्य केंद्रीत करायला हवे. भारतीय युवकांमधील नैराश्य दूर करण्यासाठी कालबध्द योजनापूर्वक प्रयत्न करायला हवेत. अन्यथा हा बुध्दिजीवी तरूण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अमेरिकेला पर्याय म्हणून युरोप, युके, कनडा, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशांकडे मोठ्या संख्येने जाईल

## शेतातून पाणी वाहत नाही तर शेतकऱ्यांचे रक्त वाहतेय...

सध्या महाराष्ट्रासह सबंध देशात पावसाने व पुराने थैमान घातले आहे. गाड्यांची वाहतूक म्हणजेच दळणवळण व्यवस्था ठप्प झाली आहे. कुठे कुठे तर पुराच्या पाण्याने लहान मोठ्या गाड्या सुध्दा वाहून जात आहेत. माणसे वाहून जात आहेत, गुरेढोरे वाहून जात आहेत, काही गावांमध्ये पावसाच्या पुराने छोटी-मोठी घरे सुद्धा वाहून गेली आहेत. ही परिस्थिती सध्या महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. नद्या, नाले, ओढे व तलाव पाण्याने पूर्णपणे दुथडी भरून वाहत आहेत. यांमध्ये येणारे पाणी हे संपूर्णतः शेतकऱ्यांच्या शेतातून येत आहे. शेतकऱ्यांच्या शेताला सध्या तलावाचे स्वरूप आले आहे. एवढा पाण्याने हाहाकार घातला आहे. शेतातील हिरवळीने नटलेले व डौलाने नाचू आगलेले जोरदार पिक जसे की, कापूस, सोयाबीन, मूग, उडीद व ऊस अतिवृष्टीच्या तडाख्याने व पावसाच्या माऱ्याने अस्ताव्यस्त झाला आहे. कापसाला लागलेली चाफे व बोंडे पावसाच्या तडाख्याने गळून पडली आहेत. सोयाबीन, मुग व उडीद तर पावसाच्या साचलेल्या पाण्यात बुजून गेला आहे. विविध फळांच्या फळबागांचा पावसाने नायनाट केला आहे. इतके प्रचंड प्रमाणात पाणी शेतकऱ्यांच्या शेतात साचले आहे. शेतकऱ्यांना शेतात जायचे म्हटले तर कसे जावे ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतातील गंभीर व भयावह परिस्थिती पाहून शेतकरी हवालदिल व नाराज झाले आहेत. उन्हाळ्यापासून शेतकरी शेतात पेरणीची तयारी करतात. अतिशय मेहनतीने व बेजार होऊन शेतीची मशागत करतात. अंगातील रक्त आटवून व रक्ताचे पाणी करून शेतकऱ्यांनी शेतात धान्य पिकवलेले असते. यंदा पिक सुद्धा जोमात व जोरात आले. यंदा पावसाने चांगली साथ दिली म्हणून शेतात पीक धान्य सुद्धा जोरात आले. नेमकेच शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक आणि यातच अतिवृष्टीने दिलेला जोरदार दणका यात शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडात आलेला घास पावसाने हिरावून नेला आहे. शेतात यावर्षी चांगली बरकत होणार म्हणून शेतकरी यंदा आनंदात होते. यंदा दिवाळी गोड होणार म्हणून शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. परंतु या महापुरात शेतकऱ्यांच्या शेताला तळ्याचे स्वरूप आल्याने संपूर्ण शेती जलमय झाली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातून पाणी वाहत नाही तर ते शेतकऱ्यांचे रक्त वाहतेय असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. निसर्गाचा कोप, मुला मुलींचे लग्न, घर प्रपंच आणि कर्जबाजारीपणामुळे यंदा आत्महत्येत प्रचंड वाढ होते की काय असे मला वाटत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळायच्या असतील, शेतकऱ्यांना सुखी व समाधानी बघायचे असेल, शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यायचा असेल आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान त्वरित पंचनामे करून त्यांच्या खात्यावर योग्य ती रक्कम द्यायची असेल तर शासनाने याचा विलंब न करता त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर योग्य ती रक्कम देऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत शेतकऱ्यांना खंबीर व मजबूत करावे आणि शेतकऱ्यांच्या शेतातून वाहू लागलेले शेतकऱ्यांचे रक्त थांबवावे एवढेच सरकारला माझे पोटतिडकिने सांगणे आहे. शेतकरी जगला तरच हे सुंदर जग टिकणार आहे.ज्या दिवशी शेतकरी शेती पिकवणे बंद करतील त्या दिवशी हे जग ठप्प होईल आणि देशात उपासमारीची समस्या निर्माण होईल, एवढे मात्र नक्की...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## नवीन जीएसटी सुधारणा विधेयक सर्वसामान्यांना मोठा दिलासा देणारा : मनोहर कुंभारे

### सावनेर पामकोर्ट लॉन येथे पत्रकार परिषद

**सावनेर, २८ सप्टेंबर :** केंद्र सरकारने नुकतेच नवीन जीएसटी सुधारणा विधेयक मंजूर केले. खऱ्याअर्थाने हि देशाच्या अर्थव्यवस्थेला व सर्वसामान्यांना दिलासा देणारा कांतिकारी निर्णय ठरणार आहे. असे मत मनोहर कुंभारे भाजप जिल्हाध्यक्ष काटोल यांनी सावनेर येथील पाम कोर्ट लॉन येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यावेळी धनरामजी देवके (मुख्य संघटक), आदर्श पटले, जिल्हा महामंत्री भाजप जिल्हा उपाध्यक्ष रामराव मोवाडे, दिनेश ठाकरे, जिल्हा सरचिटणीस आणि जिल्हा समन्वयक, उज्वला बोढारे, जिल्हा अध्यक्ष आघाडी, भाजप महिला आढखड नेत्या ज्योती कांबळे,मंदार मंगळे सावनेर मंडळ अध्यक्ष, आयुषी धपके, सोनु नवधिंगे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख तसेच सहसंयोजक जीएसटी, प्रतिक कोल्हे मंडळ अध्यक्ष कळमेश्वर, राजू घुगल, मनीष खंगारे रवींद्र ठाकूर तुषार उमाटे, राजू भुजाडे, महेश चकोल, पिंटू सातपुते, तनय मोवाडे ईत्यादींची उपस्थिती होती.

कुंभारे म्हणाले की, २०१७मध्ये केंद्र सरकारने जीएसटी कर प्रणाली देशात लागू केली होती. त्यावेळी जीएसटी मध्ये ५ १२ १८ आणि २८ टक्के असे ४ स्लॅब ठेवण्यात आले होते. सरकारने वस्तू व सेवा कर (जीएसटी) च्या स्लॅब मधील १२ आणि २८ टक्के हे स्लॅब कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. आता अधिकांश वस्तूंसाठी केवळ ५ आणि १८ टक्के अशा दोन स्लॅब ठेवण्यात आले आहे. आता नवीन करप्रणाली मुळे वस्तू व सेवांमध्ये वर्गीकरण करणे सोपे होणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगीतले.

२०१७मध्ये लागू झालेला जीएसटी हा धाडसी पण गुंतागुंतीचा टप्पा होता. या दुसऱ्या टप्प्यातील सुधारणा ही आवश्यक कोर्स करेक्शन ठरेल हे निश्चित, जो भारताच्या अर्थव्यवस्थेला नव्या उंचीवर नेईल. ही सुधारणा केवळ कर - सुलभीकरणापुरती मर्यादित न राहता भारताची जागतिक स्पर्धात्मकता वाढविणारी ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंजूर केलेल्या नवीन जीएसटी सुधारणांच्या अनुषंगाने होणारे परिणाम हे सर्वसामान्यांना आर्थिक संजीवनीच ठरणार आहे. नवीन जीएसटी सुधारणा शेतकऱ्यांसाठी आणि सर्वसामान्य जनतेसाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरणार आहेत. दैनंदिन जीवनात लागणाऱ्या अनेक वस्तूंवरील करदर कमी झाल्यामुळे स्वयंपाक घरातील खर्च कमी होईल. तूप, पनीर, दुग्ध पदार्थ, साबण, शॅम्पू यांसारख्या आवश्यक वस्तू आता अधिक स्वस्त मिळणार असल्याने सर्वसामान्यांच्या जगण्याचा भार हलका होईल.



शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या काही साहित्य व उपकरणांवरील जीएसटी कमी झाल्यामुळे त्यांचा खर्च कमी होईल. यामुळे त्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढण्याची संधी उपलब्ध होईल. वस्तू स्वस्त झाल्यामुळे बाजारात मागणी वाढेल आणि विक्रीत वाढ होऊन शेतीमालालाही चांगली किंमत मिळण्याची शक्यता आहे. या सुधारणा ग्रामीण तसेच शहरी भागातील लोकांच्या खिशाला दिलासा देणाऱ्या ठरत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर व मध्यमवगीय लोकांचे अर्थमंत्री निर्मला सीतारमण, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र सरकार वर विश्वास अजून ठाम झाला असल्याचे ते म्हणाले. पत्रकार परिषद आटोपल्यांनतर पाम कोर्ट लॉन येथे पं. दिनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी मोठ्या संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## हिट अ‍ॅन्ड रनमध्ये तरुणाचा मृत्यू

**नागपूर, २८ सप्टेंबर :** वाडी ठाण्यांतर्गत रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळला होता. पोलिसांनी त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. पोलिसांनी या प्रकरणात अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात अज्ञात वाहनाच्या धडकेत त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. आता पोलिसांनी अज्ञात वाहनाच्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. रोशन पांडुरंग ढोणे (३५) रा. पांढराबोडी, अंबाझरी असे मृताचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गत २३ सप्टेंबरच्या सकाळी ६ वाजताच्या सुमारास रोशन हे त्यांच्या एमएच-४०/सीएल-३६२२ क्रमांकाच्या मोटारसायकलवर अमरावती-नागपूर मार्गाने जात होते. रजत उत्सव बिल्डिंगसमोर भरधाव असलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की, रोशन दूरवर फेकल्या गेले. अपघातानंतर आरोपी वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. बराच वेळपर्यंत रोशन रस्त्यावर जखमी अवस्थेत पळून गेले. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या लोकांनी त्यांना जखमी पाहून घटनेची माहिती पोलिसांना दिली. वाडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. रोशन रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडून होते, तर त्यांची मोटारसायकल काही अंतरावर पडलेली होती. पोलिसांनी तत्काळ त्यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून रोशनला मृत घोषित केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांना धडक दिल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे.


## डब्लूसीएल येथे स्वच्छता ही सेवा २०२५ मोहीम

**नागपूर, २८सप्टेंबर:** स्वच्छता ही सेवा २०२५ मोहिमेअंतर्गत, २३ सप्टेंबर २०२५ रोजी डब्लूसीएल मुख्यालयात स्वच्छता मित्र सुरक्षा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात आरोग्य आणि डोळ्यांची तपासणी तसेच स्तनाच्या कर्करोगाची तपासणी करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत,डब्लू सी एल आणि आसपासच्या परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना योग्य काळजी आणि तपासणी सुविधा देण्यात आल्या.

शिबिराचे उद्घाटन डॉ. हेमंत शरद पांडे, संचालक (मानव संसाधन) यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात स्वच्छता आणि आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या अमूल्य योगदानाचे कौतुक केले, डॉ. पांडे यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा किट प्रदान केले. जेणेकरून ते त्यांचे कर्तव्य अधिक व्यवस्थित सुरक्षितपणे पार पाडू शकतील.



## शब्दकोडे क्रमांक २२२७




**आडवे शब्द :-**
१) मातापिता
५) **** *** राजाराम, पतित पावन सीताराम
१०) मध्यस्थ
११) सूर्य
१२) चांदी
१३) कातडी
१४) मंडपाच्या किंवा छताच्या शिखराचा मध्यभाग
१७) इंद्र
१८) उपयोग
२०) नूतन
२२) असुर
२४) एक छोटे चर्मवाद्य
२७) लायसेन्स (म.)
२९) उद्याच्या नंतरचा दिवस
३१) भय, भीती, शंका
३३) किंमत
३४) लोणच्यातील द्रवमसाला
३५) झोपेचे खोबरे, जागे राहाणे
३६) सतत भटकणारा
३९) सोने
४१) मोठ्ठी गंमत
४३) चंद्र
४५) पिकांचा एक हंगाम
४७) ओझी वाहणारा
४८) मूर्ती तयार करणारा
५०) फकीर, भिक्षेकरी, मदारी
५२) चाल सभ्यपणाची रीत
५५) कर्ज देणारा
५६) गुणाकार
५७) जाणे
५९) अर्धी ओंजळ
६१) पक्का चोर, गुन्हेगार, वस्ताद,
६२) विधवा
६४) पृथ्वी
६६) व्यायाम
६८) निबिड अरण्य
६९) माळ, हार
७०) रम्य
७३) अस्ताव्यस्त पडलेले सामान
७५) समाधान होणे (वा.प्र.)
७७) सततची हालचाल
७८) वजन,
७९) रक्षण करणारा

**उभे शब्द :-**
१) जहाज, नौका इ सागरी वाहन
२) नूतन
३) पाऊल (हिं.)
४) आश्चर्य
५) रविवार
६) दुर्दशा
७) तृतीया
८) रात्रीचा पाऊस
९) सरपण, कोळशाचे दुकान
१५) दार
१६) सगळा, जमिनीवरील कर
१९) पंख
२१) उपयोग
२३) जैन साधू
२५) भिंतीतील कपाट
२६) चलनवलन
२८) नाचणी
३०) यात्रेला नियमित जाणारा
३२) फणसातील खाद्यभाग
३४) जनगणना
३७) मधमाशी
३८) **** करके हमे यूं न जाईये, आपको हमारी कसम लौट आइये' एक हिंदी चित्रपट गीत
४०) अर्भकाचा गळा दाबून खून करणे (वा.प्र.)
४२) सामान
४४) थोडे, लव
४६) काकुळतेने आर्जव करणे (वा.प्र.)
४७) बंगला, मोठा वाडा
४८) एक रंगीत लाकूड
४९) कशा प्रकारचा
५१) पडदा
५३) तो पर्यंत
५४) गतिमान
५६) राजाची अत्यंत आवडती राणी
५८) नरसिंह
६०) तात्पर्य
६२) अदृष्य
६३) मोठी आग, चिता
६५) लहान
६६) वाळवी
६७) पोत्याचे कापड
७१) सापाची एक जात
७२) गाण्यातील एक शब्दालंकार
७४) प्रामाणिक
७५) ओटा, कट्टा
७६) हिन्दीत पुन्हा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## क्लेम सेटलमेंट रेशोसह आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ आघाडीवर

**अमरावती, २८ सप्टेंबर :** एप्रिल २०२५ ते जून २०२५ या कालावधीसाठी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने क्लेम सेटलमेंट रेशो ९९.६०% एवढा घोषित केला आहे. हा रेशो या व्यवसायातील सर्वाधिक आहे. विशेष म्हणजे, फार चौकशी न करता केलेल्या क्लेम सेटलमेंटसाठी लागणारा सरासरी वेळ हा फक्त १.१ दिवस एवढा होता.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सचे मुख्य ऑपरेशन्स ऑफिसर अमिश बँकर म्हणाले, जिथे आश्वासने वास्तवाशी जुळतात, तिथे दावे केले जातात. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफमध्ये, प्रत्येक दावा अत्यंत संवेदनशीलतेने हाताळला जातो आणि त्यावरील प्रक्रिया जलद केली जाते. आमची हीच तत्परता आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीतील आमच्या दावे निकाली काढण्याच्या प्रमाणात (९९.६०%) मध्ये दिसून येते. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत एकूण ४०६.८९ कोटींचे मृत्यू दावे निकाली काढले. एआय आणि एमएल आधारित तंत्रज्ञानासह डेटा ॲनालिटिक्सचा वापर आम्हाला या दाव्यांवर जलद आणि कार्यक्षमतेने प्रक्रिया करण्यास सक्षम करत आहे.

'क्लेम फॉर शुअर' या उपक्रमांतर्गत, सर्व कागदपत्रे मिळाल्यानंतर एका दिवसात सर्व पात्र दावे निकाली काढण्याचे आश्वासन कंपनी देते. आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीत, कंपनीने या उपक्रमांतर्गत एकूण छ७४.७२ कोटींचे दावे निकाली काढले आहेत.

कंपनीचे डिजिटल सक्षमकर्ते दावेदारांना दावे दाखल करण्यास आणि त्यांचा पाठपुरावा करण्यास मदत करत आहेत.


## आज का अंदाज

सोमवार २९ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 3 | 4 | 5 | 7 |
|---|---|---|---|
| 148 | 789 | 249 | 179 |
| 580 | 257 | 456 | 278 |
| 490 | 680 | 780 | 377 |
| 31 | 41 | 56 | 76 |
| 30 | 40 | 58 | 78 |
| 32 | 42 | 59 | 79 |

मुंबई बाजार

| 2 | 4 | 7 | 8 |
|---|---|---|---|
| 138 | 130 | 269 | 125 |
| 345 | 248 | 368 | 279 |
| 679 | 680 | 115 | 468 |
| 20 | 40 | 73 | 83 |
| 21 | 41 | 75 | 85 |
| 29 | 49 | 76 | 86 |

२९ सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | 51 | 80 | 90 |
| 23 | 53 | 86 | 96 |
| 27 | 57 | 84 | 94 |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
2 1 7 9 0

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचे लक्ष कौटुंबिक आणि भावनिक बाबींवर असेल. घर आणि काम यांच्यात संतुलन राखा. करिअरची प्रगती मंद असेल, परंतु संयम आणि कठोर परिश्रम यश मिळवून देतील.

**वृषभ :** आज संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. निष्पक्षता आणि समजूतदारपणामुळे भागीदारी मजबूत होईल. घाईघाईने निर्णय घेणे टाळा. काळजीपूर्वक पावले उचला. जोडीदाराशी संवाद साधा.

**मिथुन :** आजचा दिवस पूर्वीपेक्षा जास्त फायदेशीर असेल. तुम्ही तुमच्या मेहनतीवर विश्वास ठेवा आणि कठोर परिश्रम करा, तुमचे काम यशस्वी होईल. आज तुमचे उत्पन्न चांगले होईल.

**कर्क :** आज तुमची ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवा. कामाच्या ठिकाणी किंवा नातेसंबंधांमध्ये संघर्ष टाळा. तुमच्या वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करा. दिवस चिंतन आणि दीर्घकालीन नियोजनासाठी परिपूर्ण आहे.

**सिंह :** आज शिक्षण, सर्जनशीलता आणि लवचिकता बहरतील. बदलासाठी तयार राहा आणि लवचिक मानसिकता राखा. व्यावसायिकदृष्ट्या अद्वितीय कल्पना ओळखल्या जातील.

**कन्या :** तुमची ऊर्जा एक किंवा दोन कामांवर केंद्रित करा ; आर्थिक बाबींमध्ये विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अनपेक्षित खर्च टाळा. नवीन प्रकल्पांमध्ये उडी मारण्यापूर्वी जुने काम पूर्ण करा.

**तूळ :** आर्थिक बाबी किंवा करिअरमध्ये धाडकन, विचार न करता निर्णय घेणे टाळा. तुमच्या वैयक्तिक आयुष्याकडे लक्ष द्या. जास्त ऐका आणि प्रतिक्रिया कमी द्या. रागावर नियंत्रण ठेवावे लागेल.

**वृश्चिक :** नवीन प्रयत्नांमध्ये घाई करू नका. संयम आणि पाठिंबा यामुळे नातेसंबंध मजबूत होतील. दीर्घकालीन नियोजन चांगले परिणाम देईल. अनोळखी लोकांशी भांडणे टाळा.

**धनु :** आज तुम्ही वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रातही चमक दाखवाल. इतरांवर जास्त नियंत्रण ठेवण्याचे टाळा. नात्यात उदारता आणि उबदारपणा ठेवा. घरच्यांशी प्रेमाने वागा, सोबत वेळ घालवा.

**मकर :** कोणताही महत्वाचा निर्णय घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. व्यावसायिक आघाडीवर, संघर्षापेक्षा सहकार्य आणि समजूतदारपणा चांगले परिणाम देईल. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

**कुंभ :** आज व्यवसायात भागीदारीवर लक्ष केंद्रित केले जाईल. आजचा दिवस स्थिरता आणि सुरक्षिततेने भरलेला असेल. नातेसंबंधांमध्ये उबदारपणा आणि मोकळेपणा असेल.

**मीन :** आज नवीन संधी मिळतील. संवाद, अभ्यास आणि नेटवर्किंगसाठी आजचा दिवस चांगला आहे. कुटुंबियांच्या भावना हाताळताना सावधगिरी बाळगा. अनेक कामं ओढवून घेऊ नका.

# परसबागेतील भाजीपाला विक्रीतून विद्यार्थ्यांनी कमाविली श्रमप्रतिष्ठा

## 'कप बुलबुल'उपक्रमातून फुलविली हिरवाई | पीएम श्री जिल्हा परिषद पळसखेड शाळेचा अभिनव प्रयोग

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि.28 )** – पर्यावरण संवर्धन, पोषण आहार आणि स्वावलंबन या तिन्ही संकल्पनांचा संगम घडवणारा अभिनव उपक्रम पळसखेड येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळेत राबविण्यात आला आहे. 'कप बुलबुल' या विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली परसबाग फुलवली असून, त्यातील भाजीपाला विकून श्रमप्रतिष्ठा जोपासली आहे.



विद्यार्थ्यांनी परिश्रमाने उभारलेल्या बागेतून कवळा, वांगी, दोडके, दुधी भोपळा, हिरव्या मिरच्या, पत्ता कोबी, पालक, टमाटे, तेंडुळे, सांबार इत्यादी भाज्यांचे भरघोस उत्पादन मिळाले. तब्बल क्विंटलभर कवळा आणि 20 किलो वांगीसह इतर पालेभाज्या विद्यार्थ्यांनी काढल्या. या भाज्यांचा वापर शाळेच्या मध्यान्ह आहारात करून मुलांना शुद्ध, ताज्या आणि पौष्टिक भाज्या मिळत आहेत. यामुळे मुलांच्या आरोग्याबरोबर शाळेचा खर्चही कमी झाला आहे. सेंद्रिय खतांचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने ही बाग फुलवली गेली. पालक व ग्रामस्थांकडून या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून ग्रामीण शाळा स्वयंपूर्ण कशा होऊ शकतात याचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

### श्रमप्रतिष्ठेची रुजवणूक

शाळेचे शिक्षक तुळशीराम चव्हाण म्हणाले, शालेय मूल्यांपैकी श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पटवून देता आले आहे. परसबागेतून मिळालेल्या उर्वरित भाज्या बाजारात विकून प्रत्यक्ष शेतीचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळतो आहे. विक्रीतून आलेली रक्कम शालेय उपक्रमांसाठी वापरली जाणार आहे.

### शाळेचा स्वावलंबी मार्ग

गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ यांनी सांगितले की, पळसखेड शाळेचा हा प्रयोग शाळा ही केवळ शिक्षणापुरती मर्यादित नसून उपजीविकेचे मार्गदर्शन देणारी जागा आहे, हे अधोरेखित करणारा आहे. यापूर्वी या शाळेतील विद्यार्थ्यांनी राख्या तयार करून त्यांची विक्री केली होती.

### खडकाळ जमिनीतून फुलली हिरवाई

मुख्याध्यापक संजय शेलोकार यांनी सांगितले की, सुरुवातीला खडकाळ असलेली शाळेची जागा 10 ट्रक गाळाच्या मातीनं समृद्ध करण्यात आली. त्यावर गांडूळखत व सेंद्रिय खतांचा वापर करून बाग तयार करण्यात आली. यामध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि शाळा व्यवस्थापन समितीने उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## मार्शल आर्ट्स स्पर्धेत तिथि जैन ला गोल्ड मेडल

**चांदूर रेल्वे** – शहरातील डॉ. अभिषेक जैन यांची लहान मुलगी तथा अमरावतीच्या पोद्दार इंटरनॅशनल शाळेची वर्ग सातवी ची विद्यार्थिनी तिथी अभिषेक जैन हिने अमरावती येथे झालेल्या 29 व्या स्टेट लेव्हल चॅम्पियनशिप 2025 मार्शल



आर्ट स्पर्धेत गोल्ड मेडल प्राप्त केले आहे. तिथी ने महावीर मुकुंद धुलकर यांच्या मार्गदर्शनात सदर यश प्राप्त केले. तिने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक व जैन परिवाराला दिले आहे. तिच्या यशामुळे जैन समाजाचे नाव उंचावल्या गेले असून तिच्यावर सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## उद्योजकावर हल्ला करणारी अल्पवयीनांची टोळी ताब्यात

**अमरावती** – उद्योजक पवन लड्ढा यांच्यावर केलेल्या हल्ल्याच्या प्रकरणात पोलिसांनी अल्पवयीन मुलांची टोळी फिल्मी स्टाइलमध्ये ताब्यात घेतली आहे. या कारवाईचे नेतृत्व ठाणेदार पुनीत कुलट यांनी केले, तर त्यात पीआयएस मिलिंद हिवरे, मनीष करपे आणि सागर भजगवरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. या गॅंगवरील कारवाईत पोलिसांनी ठोस योजना आखून, संशयितांना घेराव्यात घेऊन, वेळेत ताब्यात घेतले. सदर प्रकरणाचे तपास अद्याप सुरू असून, अल्पवयीन टोळीवरील पुढील न्यायिक कारवाईसाठी पोलिस तपास यंत्रणेत ठेवण्यात आले आहे. पोलिसांनी अशी कारवाई लोकांमध्ये सुरक्षा आणि विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले आहे.

# दसरा, मांडवसीला यात्रा भरे घनदाट, आम्हा सांगे कृष्णनाथ, भक्ती करा होईन भेट!

## श्री क्षेत्र सावंगा ( विठोबा ) नगरीत दसरा यात्रा महोत्सव

- 72 फूट उंच झेंड्याना खोळ चढवली जाणार
- कापुराच्या ज्वाळातून भक्तीचा प्रकाश

महासागर | रवि कलाने

**चांदुर रेल्वे, ( दि. 28 )**– तालुक्यातील जगप्रसिद्ध कापुराची यात्रा म्हणून ख्याती असलेल्या कृष्णाजी ऊर्फ अवधूत महाराजांचे श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) नगरीत यंदा दसरा यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

यात्रा महोत्सवानिमित्त दिनांक 2 ऑक्टोबर 2025, गुरुवार रोजी सकाळी 11 वाजता चंदनउटी व रमणा सोहळा पार पडणार असून दुपारी 4 वाजता श्रीकृष्ण अवधूत महाराजांचे 72 फुट उंच दोन झेंडे चढविण्याचा नेत्रदीपक व चित्तथरारक सोहळा संपन्न होणार आहे.

हा सोहळा संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर, सावंगा (विठोबा) यांच्या शुभहस्ते व लाखो भाविकांच्या साक्षीने पार पडणार असून भजनाच्या गजरात कापुराची प्रज्वलन करून हा पारंपरिक कार्यक्रम संपन्न होईल.

भाविक भक्तांच्या सोयीसाठी अमरावती व चांदुर रेल्वे येथून विशेष यात्रा बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी अन्नदान समितीच्या माध्यमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात



आले आहे. महोत्सवानंतर संस्थानच्या वतीने 6 ऑक्टोबर 2025, सोमवार रोजी कोजागरी पौर्णिमा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, रात्री 12 वाजता कोजागरी प्रसादाचे वितरण होणार आहे. भाविकांनी सहभागी होऊन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानने केले आहे.



### दैनंदिन काकडा आरती होणार

यासोबतच दरवर्षीप्रमाणे 7 ऑक्टोबर 2025 ते 5 नोव्हेंबर 2025 या कालावधीत दैनंदिन पहाटे 5 ते 7 या वेळेत काकडा कार्यक्रम सुरू राहणार आहे. या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी संस्थान तर्फे नाश्ता व चहाची व्यवस्था केली आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून सहभाग घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी आदींनी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने केले आहे.

# वरुडमध्ये नागपूर कराराची होळी



## विदर्भ राज्याच्या मागणीला जोर

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 28 )**– विदर्भ हा समृद्ध भूमीचा, काळ्या कसदार मातीतून उगवणाऱ्या अन्नधान्याचा, बुद्धिवंत व शांत संस्कृतीचा प्रदेश. तरीही आज या भूमीला अन्याय व उपेक्षा भोगावी लागत आहे. याच अन्यायाच्या विरोधात नागपूर कराराची होळी आंदोलन रविवारी वरुड येथे तहसील कार्यालयासमोर करण्यात आले.

सन 1953 मध्ये नागपूर कराराद्वारे विदर्भाला महाराष्ट्राच्या विकासात 23 टक्के वाटा देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु गेल्या सात दशकांत हा करार पाळला गेला नाही. सहा आठवड्यांचे नागपूर अधिवेशन सहा दिवसांवर आले, राजधानी मुंबईला गेल्याने संपर्क व निर्णय प्रक्रियेत विदर्भ मागे राहिला. परिणामी शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, कुपोषण, दारिद्र्य व विकासाचा तुटवडा हा विदर्भाच्या माथी आला. आता आम्हाला आश्वासने नकोत, विकास मंडळे नकोत, आमचे स्वतंत्र राज्यच हवे अशा घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. आंदोलनात कराराच्या प्रतीची होळी करण्यात आली. कार्यकर्त्यांचा एकमुखी निषेध होता की, राज्यानेच नागपूर करार पाळला नाही, त्यामुळे हा करार आपोआपच तुटला असून आम्हाला महाराष्ट्रात राहायचे नाही, स्वतंत्र विदर्भ राज्यच निर्माण झाले पाहिजे. या आंदोलनात दिलीप भोयर, गणेश कुसराम, डॉ. नीलकंठ यावलकर, दिलीप सराटकर, डॉ. शैलेंद्र लोखंडे, अशोक वानखडे, अनिल वानखडे, युवराज कराळे, अरविंद वानखडे, महेश पवार, पुंडलिक लोहकरे, सुरेश टाकरखेडे, रवी गहलोद, रत्नाकर वानखडे, संदीप क्षीरसागर, पंकज कुमरे, सतीश सोनुले, भागोश्याम बोरामासे, अशोक गडलिंग, उमेश नेरकर, हेमंत पाचघरे, बाबाराव माकोडे, पुंडलिक बोराडे, बाबाराव लोहकरे, सुधीर देवघरे, प्रभाकर देशमुख, अरुण आवारे, संजय धुर्वे, अभिषेक जाधव, अनिकेत खंडारे, शिवराम वरखडे आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. या आंदोलनामुळे वरुड तालुक्यात विदर्भ राज्य निर्मितीची चळवळ पुन्हा एकदा जोर धरताना दिसली.

# अंजनगाव बारीत 'दुर्गा माता दौंड'

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि. 28 )** – दरवर्षी प्रमाणे अंजनगाव बारी येथील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, अंजनगाव बारी याच्या कडून गावात भक्तिमय वातावरण निर्माण करण्याचा उद्देशाने घटस्थापना ते विजयादशमी (दसरा) श्री दुर्गामाता दौड ( प्रभात फेरी ) आयोजन करण्यात येणार आहे. आई जगदंबेचा



तसेंच राष्ट्रभक्तीचा उदो-उदो करत व स्त्री शक्तीचा जागर करीत ही दौड 22 सप्टेंबर ते 1 ऑक्टोंबर पर्यंत दररोज सकाळी 6 वाजता निघेल. यामध्ये गावातील नागरिक महिला, तरुण मुला-मुलींनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, अंजनगाव बारी सेवाधारी मंडळी कडून करण्यात आले आहे.

# वृक्षारोपण, स्वच्छता, शालेय साहित्य वाटप

## ब्राह्मणवाडा थडीमध्ये 'डी.जी.बेल्हेकर इन्फ्रा प्रा. लि.'चा उपक्रम



महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 28 )** तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी येथे डी. जी. बेल्हेकर इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम, शालेय साहित्य व मिठाई वाटपाचा उपक्रम राबविला. या उपक्रमात ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. गावातील विविध भागात स्वच्छता मोहिम राबवली गेली, ज्यामध्ये ग्रामस्थ व शाळकरी मुलांनी सक्रिय सहभाग घेतला. यामुळे गावाचा परिसर स्वच्छ व आकर्षक दिसू लागला.

उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना शालेय साहित्य जसे की वह्या, पेन्सिली, कंपास पेटी तसेच मिठाईचे वाटप करण्यात आले. या छोट्या भेटींमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. या वेळी जिल्हा परिषद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक मो. सिद्दिक मो. शफी, जिल्हा परिषद मुलांची शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पा बिडकर, मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सरिता दाभाडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि कंपनीचे आयुष आनंद (प्रोजेक्ट मॅनेजर), विशाल वैध (प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर), नितीन अवसरमोल, समीर खान, मनी भूषण सिंग, नवनाथ शिंदे उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची उत्सुकता वाढली तर गावात स्वच्छता आणि हरितायुष्याला चालना मिळाली. कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर आयुष आनंद यांनी भविष्यातही असेच उपक्रम राबविण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी कंपनीच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत भविष्यात अधिक असे कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

## रतनाबाई खेरडे यांचे निधन

**मोर्शी**– येथील साई कॉलनी स्थित श्रीमती रत्नाबाई गुलाबराव खेरडे यांचे वयाचे 79 व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांचे पश्चात तीन मुले, दोन मुली आणि नातवंडे असा मोठा आप्त परिवार आहे. मोर्शी पोलीस स्टेशन वरून नुकतेच सेवानिवृत्त झालेले पीएसआय प्रदीप खेरडे, प्रवीण खेरडे आणि प्रशांत खेरडे यांच्या त्या आई होत्या. त्यांच्या अंत्ययात्रेला भला मोठा आप्तस्वकीयांचा जनसमुदाय उपस्थित होता.



# आनुष स्पेनच्या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलसाठी दाखल

## वरुडचा मान उंचावला

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, ( दि. 28 ) :** शहरातील आनुष अश्वपाल वानखडे याने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवत वरूडचा मान उंचावला आहे. पुण्याच्या प्रतिष्ठित फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया येथे डिरेक्शन विषयात पीजी डिप्लोमा शिकत असलेल्या आनुषची स्पेन येथे होणाऱ्या जागतिक फिल्म फेस्टिव्हलसाठी निवड झाली आहे.



21 ते 28 सप्टेंबर 2025 या कालावधीत स्पेनमध्ये आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल पार पडणार असून स्त्रञ्जद्ध पुणे तर्फे आनुष व त्याचा सहकारी मिलन कुमार (गुजरात) यांची निवड झाली आहे. आनुष 19 सप्टेंबर रोजी भारतातून रवाना झाला असून 21 तारखेपासून स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये सहभागी झाला आहे. या फेस्टिव्हलमध्ये आनुष ज्युरी सदस्य म्हणून काम पाहत असून, जगभरातील नवोदित दिग्दर्शकांनी तयार केलेल्या शॉर्ट फिल्म्सचे मूल्यांकन करणाऱ्या पॅनेलमध्ये तो सहभागी आहे. त्याचबरोबर नामवंत फिल्म मेकर्ससमोर स्वत:च्या आयडिया व शॉर्ट फिल्म्सबद्दल प्रेझेंटेशन करण्याची संधीही त्याला मिळाली आहे. भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान आनुष व मिलन कुमार या दोघांना मिळाला असून फेस्टिव्हल तीन वेगवेगळ्या विभागांत पार पडत आहे. विदर्भातील एकमेव विद्यार्थी म्हणून या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होण्याचा बहुमान आनुषला मिळाला आहे. या प्रवासाकरिता मदत करणारे नितीन बनसोड, अमोल कुकडे, राहुल वानखडे, तन्वी पुरोहित, आदित्य व शिखा तिडके यांचे त्याने मन:पूर्वक आभार मानले आहेत. आनुषच्या या यशामुळे वरूड शहराचा लौकिक वाढला असून तरुणाईसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे. निनाद गव्हाड, गोपाळ तायवाडे, वासुदेव लांडगे, माजी प्राचार्य निशिकांत बेलसरे, गिरीश कराळे, मोरेश्वर वानखडे, नितीन ठाकरे आदींसह असंख्य हितचिंतकांकडून त्याचे अभिनंदन होत आहे.

# जन्मजात मुकबधीर चार वर्षीय बालकावर शस्त्रक्रिया

## राज्यात पहिलीच क्रॉक्लियर इम्प्लांट यशस्वी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 28 )**– सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून अमरावतीत ऐतिहासिक वैद्यकीय कामगिरी साधली गेली आहे. जन्मजात मूकबधिर असलेल्या चार वर्षीय बालकावर शुक्रवार, 26 सप्टेंबर रोजी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात राज्यातील पहिली क्रॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या अत्याधुनिक शस्त्रक्रियेमुळे बालक आता हळूहळू आवाज ऐकण्यास सक्षम होईल आणि येत्या काळात बोलण्यासही शिकेल, असे तज्ज्ञांनी सांगितले.

बालकाचे आई-वडील दोन वर्षांच्या झाल्यानंतर लक्षात आले की त्यांचा मुलगा ऐकू आणि बोलू शकत नाही. अनेक उपचारानंतरही फरक न पडल्यामुळे त्यांनी क्रॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी निर्णय घेतला. ही शस्त्रक्रिया गंभीर श्रवणबाधित बालकांसाठी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान वापरून केली जाते, ज्यामध्ये कानात बसवलेल्या उपकरणाद्वारे मेंदूशी संपर्क साधला जातो, त्यामुळे आवाज ऐकणे शक्य होते. शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी घेऊन बालक मुख्य प्रवाहात समाविष्ट होतो.



### सामानय कुटूंबासाठी वरदान

सार्वजनिक रुग्णालयात ही शस्त्रक्रिया होणे सामान्य कुटुंबांसाठी वरदान ठरले आहे, कारण खासगी रुग्णालयात यासाठी दहा लाखांपर्यंत खर्च येतो. साडेचार वर्षांच्या बालकासाठी कोणत्याही योजनेत सुविधा उपलब्ध नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ईएनटी तज्ज्ञ डॉ. जीवन वेदी, डॉ. मंगेश मेंढे, बधिरीकरणतज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दीपाली देशमुख, डॉ. शीतल सोळंके, डॉ. अश्विनी मडावी, डॉ. रमनिका, डॉ. उज्ज्वला मोहोड यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. ही शस्त्रक्रिया अमरावतीतल्या हजारो बालकांसाठी प्रेरणादायी ठरू शकते.

# साडे चारशे वर्षा पासून गावाचे रक्षण करणारी जगदंबा देवी

## विविध आजार, भूतबाधा पासून सुटका करणारी माता संपूर्ण शहराचे श्रद्धास्थान



महासागर | प्रतिनिधी

**चांदुर रेल्वे, ( दि. 28 )** – जुन्या शहरातील डांगरीपुरा भागात वसलेले जगदंबा मातेचे मंदिर हे साडे चारशे वर्षांचा इतिहास सांगणारे प्राचीन धार्मिक स्थळ आहे. नवरात्रात हे मंदिर रोषणाईने उजळून निघते. देवीची मूर्ती जागृत आणि स्वयंभू मानली जाते. विविध आजार, संकटे आणि भूतबाधांपासून सुटका करून देणारी माता म्हणून हे मंदिर संपूर्ण शहराचे श्रद्धास्थान ठरले आहे.



इ.स. 1550 च्या सुमारास गावाची निर्मिती होत असताना उत्तर प्रदेशातील बैसवाडा गावातून आलेल्या भैसे कुटुंबाच्या पूर्वजांना हे गाव बक्षीस म्हणून मिळाले. त्यावेळी निजाम व भोसले यांची राजवट होती. गावात पाच एकरांची गढी आणि त्याचबरोबर जगदंबा मातेचे मंदिर उभारण्यात आले. सुरुवातीला या कुटुंबातच देवीची पूजा चालायची. इतिहास सांगणाऱ्या भाटांच्या आख्यायिकेनुसार, गावावर आलेल्या संकटांपासून लोकांना मुक्त करण्यासाठी देवीची स्थापना झाली. जगदंबा मातेच्या मंदिराला भाविक नवसाला पावणारी माता म्हणून मानतात. गावाच्या रक्षणकर्त्या देवीच्या मंदिरात भक्त दररोज गर्दी करतात. नवरात्रीच्या नऊ दिवसांत तर भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती मंदिर परिसर गजबजून टाकते. भक्तिभाव, श्रद्धा आणि परंपरा यांचा संगम असलेले हे मंदिर आजही शहराच्या सांस्कृतिक व धार्मिक ओळखीचा महत्त्वपूर्ण भाग ठरत आहे.

### 'ब' श्रेणी मान्यतेची मागणी

जगदंबा माता मंदिर हे वर्षभर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे केंद्रस्थान आहे. येथे दररोज तसेच नवरात्रीसारख्या मोठ्या उत्सवात हजारो भाविक येतात. मात्र, भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. त्यामुळे मंदिराला शासनाकडून 'ब' श्रेणीची मान्यता मिळावी, अशी मागणी विश्वासू मंडळाने केली आहे. या मान्यतेमुळे मंदिराचा विकास साधता येईल आणि भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध होतील.

### देवीच्या जागृतीचा अनुभव

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी गावात कॉलऱ्याचा प्रादुर्भाव झाला होता. मृत्यूमुळे गावात मरगडी सुरू होती. त्या वेळी ग्रामस्थांनी देवीच्या नावाने नवस बोलून खापरीतील ज्योत घेऊन संपूर्ण गावाला प्रदक्षिणा घातली. या धार्मिक कृत्यानंतर गाव आजारातून मुक्त झाले. तेव्हापासून देवी जागृत मानली जाऊ लागली आणि ग्रामस्थ तिला रक्षणकर्ती म्हणून पुजू लागले.

### मंदिराचा सध्याचा विकास

सध्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे नियोजन सुरू असून, भक्तांच्या मदतीने सोयीसुविधा वाढवल्या जात आहेत. जुन्या वस्तीत असलेल्या या मंदिराला भाविकांनी सढळ हाताने मदत केल्याने आरती, पूजाविधी व इतर उपक्रम अधिक आकर्षक पद्धतीने पार पडतात. मंदिर समितीचे अध्यक्ष सचिन वर्मा यांनी सांगितले की, नवरात्रीच्या काळात शहरातील 1 1 1 कुटुंबांनी अखंड दिवे तेवत ठेवण्याची परंपरा सुरू केली आहे. त्यामुळे मंदिर परिसर दिवसरात्र प्रकाशमय राहतो.

# कॅलिडोस्कोप




## आईच आकारते मुलीकडून घरभाडे!

अमेरिकेतील अटलांटा येथे एक अनोखा प्रकार उघडकीस आला. येथे एक महिला तिच्या जुळ्या मुलींकडून घरात राहण्यासाठी भाडे आकारते. इतकेच नाही, तर भाडे वेळेवर न दिल्यास ती मुलींना दंडदेखील करते. ती महिला म्हणते, की ती हे सर्व त्यांच्या कल्याणासाठी करत आहे.

जॉर्जियातील ३८ वर्षीय टोया व्हिटफिल्ड आपल्या ग्रेस आणि ऑटम या नऊ वर्षांच्या जुळ्या मुलींकडून घरात राहण्यासाठी भाडे आकारते. या अनोख्या पद्धतीमागील उद्देश तिच्या मुलींना पैशाचे आणि आर्थिक जबाबदारीचे महत्त्व शिकवणे आहे. टोयाच्या मुलींनी एकदा तिच्याकडे महागड्या रेस्टॉरंटमध्ये जाण्याचा आग्रह धरला. टोयाला जेव्हा आपल्याकडे इतके पैसे नाहीत, असे सांगितले, तेव्हा मुली लगेच म्हणाल्या, तुला तर तुझा पगार मिळाला आहे... हे ऐकून टोयाला समजले, की मुलींना पैशाचे महत्त्व अजिबात समजत नाही. त्यानंतरच तिने ठरवले, की ती आपल्या मुलींना जीवनाचा धडा शिकवेल. यानंतर, टोयाने आपल्या मुलींसाठी एक बनावट भाडे करार आणि पैसे खेळा प्रणाली तयार केली, जेणेकरून त्यांना जबाबदारीची जाणीव होईल. या अंतर्गत, ती दर आठवड्याला आपल्या मुलींना पगार म्हणून काही पैसे देते. त्यातून त्यांना घरभाडे, वीज, वाय-फाय आणि गॅससारखे खर्च द्यावे लागतात. तिने मुलींना असेही सांगितले, की त्यांनी घर घाण केले किंवा वेळेवर भाडे दिले नाही, तर दंड आकारला जाईल. इतकेच नाही तर, त्यांना घराबाहेरही हाकलून दिले जाऊ शकते.

याशिवाय, चांगले गुण मिळवण्यासाठी, चांगले वागण्यासाठी ती मुलींना बोनस देते. या पद्धतीने मुलींना पैशाचे महत्त्व शिकवले जाईल, असा तिचा विश्वास आहे.




## पेट्रोल भरले आणि झाले अब्जाधीश!


देव जेव्हा देतो, तेव्हा छप्पड फाडून देतो. कधी कधी काही माणसांचे नशीब क्षणार्धात पालटते. एका व्यक्तीची अशीच कहाणी समोर आली आहे. ही कहाणी ऐकल्यावर तुमचाही विश्वास बसेल, की माणसाच्या नशिबाचा काही भरवसा नाही, ते कधीही पलटू शकते. अमेरिकेतील दोन कोपऱ्यांमध्ये मिसुरी आणि टेक्सास येथे दोन लॉटरीची तिकिटे विकली गेली होती. या दोन तिकिटांनी ती विकत घेणाऱ्या व्यक्तींचे नशीबच पलटले. अमेरिकेतील दोन व्यक्तींना १.७९ अब्ज डॉलरचा ऐतिहासिक पॉवरबॉल जॅकपॉट मिळाला. गेल्या तीन महिन्यांपासून हा जॅकपॉट कोणालाच मिळाला नव्हता. या धक्कादायक प्रकराने लॉटरीच्या इतिहासात नवीन कहाणी जोडली गेली. इतकच नव्हे, तर दोन सामान्य नागरिकांना काही सेकंदातच अब्जाधीश बनवले.

हा पॉवरबॉलच्या इतिहासातील दुसरा सर्वात मोठा जॅकपॉट होता. याचा अर्थ असा, की दोन्ही विजेते एक तर ८९५ दशलक्ष डॉलरचा वार्षिक हप्ता पर्याय निवडू शकतात किंवा ४१०.३ दशलक्ष डॉलरची रक्कम घेऊ शकतात. फ्रेडरिक्सबर्ग नावाच्या एका छोट्या गावातील व्यक्तीने पेट्रोल पंपावर लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते. या तिकिटातून तो अब्जाधीश बनला. पॉवरबॉल जॅकपॉट हा २०२५ मधील सर्वात मोठा जॅकपॉट ठरला आहे. त्याने मार्चमध्ये कॅलिफोर्नियामध्ये जिंकलेल्या ५२६.५ दशलक्ष डॉलरच्या जॅकपॉटला मागे टाकले. यापूर्वी २०२३ मध्ये कॅलिफोर्नियातील थिओडोरस स्ट्रक आणि त्यांच्या गटाने १.७६५ अब्ज डॉलर जिंकले होते, तर २०२२ मध्ये एडविन कॅस्ट्रोने आतापर्यंतचा सर्वात मोठा २.०४ अब्ज डॉलरचा पॉवरबॉल जॅकपॉट जिंकला होता. ३१ मे रोजी कॅलिफोर्नियात विकल्या गेलेल्या २०४.५ दशलक्ष डॉलरच्या अनक्लेम्ड तिकिटानंतर पहिल्यांदाच असे ग्रँड प्राइज जिंकले गेले.

हा खरोखरच नशिबाचा खेळ होता. कारण यात जिंकण्याची शक्यता अत्यंत कमी असते. लकी ड्रॉच्या रात्री १५ इतर खेळाडूंनीही एक दशलक्ष डॉलर जिंकले. यापैकी कन्सास आणि टेक्सासच्या दोन खेळाडूंनी पॉवर प्ले चा पर्याय निवडला. त्यामुळे त्यांची रक्कम थेट दोन दशलक्ष डॉलर झाली. या विजेत्यांमध्ये कॅलिफोर्निया, इलिनॉय, न्यूयॉर्क, ओहायो, टेक्सास, फ्लोरिडा, मिशिगन, कोलोराडो, न्यू जर्सी, मॅसाचुसेट्स, वेस्ट व्हर्जिनिया, ओरेगन आणि कन्सास यासारख्या राज्यांतील रहिवाशांचा समावेश आहे.

## अनोखा युरेनस

आपल्या सूर्यमालेतल्या प्रत्येक ग्रहाचं ठळक वैशिष्ट्य आहे. युरेनस नावाचा एक ग्रह आहे. युरेनसवर वायूंचं प्रमाण खूप जास्त आहे. दुर्बिणीतून शोधण्यात आलेला युरेनस हा आपल्या सूर्यमालेतला पहिलाच ग्रह आहे. हा सातव्या क्रमांकाचा सर्वात लांबचा ग्रह आहे. युरेनस स्वत:भोवती फिरतो. तो १७ तासांमध्ये एक फेरी पूर्ण करतो. इथलं एक वर्षं पृथ्वीवरच्या ८४ वर्षांइतकं असतं. युरेनस ग्रहावर ४२ वर्षं रात्र आणि ४२ वर्षं दिवस असतो. त्यामुळे या ग्रहाचा एक ध्रुव सतत ४२ वर्षं सूर्यासमोर तर दुसरा ध्रुव अंधारात असतो. युरेनस सूर्यापासून जवळपास तीन अब्ज किलोमीटर दूर आहे. इथलं सरासरी तापमान उणे १९७ अंश असतं. इथलं कमाल तापमान उणे २२४ अंशांपर्यंत जातं. या ग्रहाला २७ उपग्रह आहेत. यापैकी बरेच उपग्रह छोटे आणि असंतुलित आहेत. म्हणूनच हा ग्रह अनेक अर्थांनी वेगळा आहे.



## तेलंगणातील एका माशाला माणसासारखे दात!



तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातील एका घटनेमुळे सर्वांनाच धक्का बसला आहे. गोदावरी नदीच्या फुगवट्याच्या पाण्यात एका मच्छीमाराला एक विचित्र मासा सापडला. त्याचे दात अगदी माणसांसारखे आहेत. हा मासा पाहून मच्छीमारच नाही तर आजूबाजूचे लोकही आश्चर्यचकित झाले. हा अनोखा मासा पाहण्यासाठी दूरदूरून लोक येत आहेत.

ही घटना निर्मल जिल्ह्यातील गोदावरी नदीच्या फुगवट्यातील पाण्यामधील आहे. एक स्थानिक मच्छीमार दररोजप्रमाणे पहाटे मासे पकडण्यासाठी गेला होता. त्याने जाळे टाकले आणि ओढले तेव्हा त्यात एक मासा अडकला. का मासा पाहून तो थक्क झाला. माशाकडे काळजीपूर्वक पाहिल्यावर त्याच्या तोंडात माणसांसारखे दोन ओळीचे दात आहेत, असे आढळले. हे पाहून मच्छीमार थक्क झाला. त्याने ताबडतोब आपल्या साथीदारांना बोलावले आणि ही बातमी संपूर्ण गावात पसरली. स्थानिक लोक म्हणतात, की त्यांनी संपूर्ण आयुष्यात असा मासा कधीही पाहिला नाही. काही लोक याला चमत्कार मानत आहेत तर काहीजण त्याला निसर्गाचा चमत्कार म्हणत आहेत. शास्त्रज्ञांनी सांगितले, की हा माशांचा एक विशेष प्रकार आहे. त्याला 'पाकू फिश' म्हणतात. हा मासा सहसा दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीत आढळतो. हा पिरान्हा माशांच्या कुटुंबातील आहे; परंतु तो पिरान्हासारखा धोकादायक नाही. पिरान्हा मासा मांसाहारी आहे; परंतु पाकू मासा शाकाहारी आहे. त्यांचे मुख्य अन्न फळे, बिया आणि पाण्यात वाढणारी वनस्पती आहे. पाकू माशांचे दात माणसांसारखे असतात. त्यामुळे ते आणखी वेगळे दिसतात. हे दात इतके मजबूत आहेत, की हा मासा कठीण फळे आणि बिया सहजपणे चावू शकतो. तथापि, हा मासा मानवांना अजिबात हानी पोहोचवत नाही.

हा मासा भारतात कुठून आला?

तज्ज्ञांच्या मते हा मासा व्यापार किंवा इतर मार्गाने भारताच्या जलाशयात आला असावा. अनेक वेळा लोक परदेशी मासे मत्स्यालयात ठेवण्यासाठी आणतात आणि नंतर नद्या किंवा तलावात सोडतात. अशा प्रकारे हा मासा गोदावरी नदीत पोहोचला असावा.



## या देशात बायका मिळतात भाड्याने!

जगात एक असा देश आहे, जो त्याच्या नैसर्गिक सौंदर्यामुळे, समुद्रकिनारे आणि नाईटलाइफमुळे प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. या देशाचे नाव आहे थायलंड. त्याचे सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करते. आजकाल हा देश एका अनोख्या आणि वादग्रस्त सामाजिक ट्रेंडमुळे चर्चेत आहे. थायलंडमध्ये बायको भाड्याने घेण्याचा ट्रेंड दिवसागणिक वाढताना दिसत आहे.

थाडलंडमधील गरीब कुटुंबातील महिला हे काम करतात. त्यामुळे त्या आपल्या कुटुंबाची भूक भागवू शकतात. या देशात महिला कायम बार आणि नाईट क्लबमध्ये काम करताना दिसतात. तिथे त्यांची परदेशी पर्यटकांसोबत ओळख होते. 'भाड्याने बायको' या ट्रेंडला 'वाइफ ऑन हायर' किंवा 'ब्लॅक पर्ल' असे म्हणतात. यामध्ये काही महिला पर्यटकांसोबत काही काळासाठी त्यांच्या बायकोप्रमाणे राहतात. महिला पर्यटकांसाठी जेवण बनवतात, त्यांच्यासोबत फिरायला जातात, एका जोडीदाराप्रमाणे पर्ययटकांसोबत राहतात. हे नाते पूर्णपणे करारावर आधारित असते आणि त्याला कायदेशीर विवाहाचा दर्जा मिळत नाही.

एखाद्या पर्यटकाला त्या महिलेबद्दल खोलवर प्रेम वाटत असेल, तर भविष्यात दोघे लग्न करू शकतात. 'भाड्याने घेतलेल्या बायको'ची फी महिलेचं वय, सौंदर्य, शिक्षण आणि कराराचा कालावधी यावर अवलंबून असते. काही महिला काही दिवस राहतात, तर काहीजणी काही महिने राहतात. त्यापोटी द्यावे लागणारे भाडे सुमारे १.३ लाख रुपयांपासून ९६ लाख रुपयांपर्यंत असू शकते. हा पूर्णपणे खासगी करार असतो, कारण थायलंडमध्ये यासाठी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. बदलती जीवनशैली आणि वाढत्या एकाकीपणामुळे थायलंडमध्ये या ट्रेंडला चालना मिळाली असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे थायलंड सरकारनेही हे मान्य केले आहे, की ही प्रवृत्ती वेगाने पसरत आहे. सरकार आता यावर कायदा करण्याचा विचार करत आहे, जेणेकरून या कामात सहभागी असलेल्या महिलांची सुरक्षितता आणि हक्क सुनिश्चित करता येतील.

## सिगारेट प्यायला बंदी, तर ॲश ट्रे का?

जागतिक स्तरावर विमानांच्या सुरक्षेसंदर्भात ठराविक नियम काटेकोरपणे पाळले जातात. हे नियम देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांना लागू असतात. असाच एक नियम म्हणजे, विमानात धूम्रपान करायचे नाही. विमानामध्ये धूम्रपान करण्यास बंदी असते.

विमानातील इंधन अत्यंत ज्वलनशील असते, तसेच विमान उड्डाणादरम्यान इतर प्रवाशांना सिगारेटचा त्रास होऊ शकतो. याबरोबरच अशा ज्वलनशील गोष्टींमुळे अपघाताची शक्यता असल्याने विमानामध्ये धूम्रपान करण्यास बंदी असते; मात्र असे असले, तरी विमानामध्ये सिगारेट विझवण्यासाठी वापरले जाणारे ॲश ट्रे मात्र दिसून येतात. आता कोणत्याही सामान्य व्यक्तीला असा प्रश्न पडू शकतो, की विमानात सिगारेट फुंकायला बंदी असते तर या ॲशट्रेचे इथे काय काय?

विमान हे फार गुंतागुंतीचे यंत्र आहे. त्यात शेकडो लोकांना एकाच वेळी घेऊन प्रवास करणाऱ्या विमानामधील छोटीशी चूक साऱ्यांचा जीव धोक्यात घालू शकते. त्यामुळे विमानप्रवासादरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले अनेक नियम जागतिक स्तरावर तयार करण्यात आले असून त्याचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असते. याच नियमांद्वारे विमानात सिगारेट ओढण्यास परवानगी दिली जात नाही. असे असले, तरी प्लेनमध्ये ॲशट्रे असतात. अनेक नामांकित कंपन्यांच्या विमानांमधील शौचालयात ॲशट्रे आवर्जून दिसून येतात; मात्र त्याचबरोबर त्याच्याच बाजूला धूम्रपान करण्याची परवानगी नाही किंवा 'नो स्मोकिंग' चा बोर्डही दिसतो.

स्मोकिंग करायचे नाही, तर हा सिगारेट विझवण्याचा ॲशट्रे इथे का दिला आहे, एवढा वायफळ खर्च का केला जातो, यामागील लॉजिक काय आहे असे बरेच प्रश्न पडतात. धूम्रपानाला बंदी असली,




तरी विमानांच्या टॉयलेटमध्ये ॲशट्रे बसवण्यामागे एक फारच खास कारण आहे. 'सोशल मीडिया'वर एका हवाई सुंदरीने प्रश्नाचे उत्तर दिले असून सध्या हे उत्तर चर्चेचा विषय ठरले आहे. हवाई सुंदरीने दिलेल्या माहितीनुसार, एखाद्या प्रवाशाने फ्लाइटमध्ये सिगारेट ओढण्याची चूक केली तर त्याला विमान जमिनीवर उतरल्यानंतर अटक केली जाते. धूम्रपान करण्यास बंदी असली, तरी विमानाच्या टॉयलेटमध्ये ॲशट्रे दिसून येतात. हे ॲशट्रे बसवण्यामागील कारण हे सुरक्षेचे आहे. सुरक्षिततेच्या उद्देशानेच विमानात धुम्रपान बंदी असतानाही ॲशट्रे बसवले जातात, असे तिने सांगितले.

काही प्रवासी बंदी असूनही विमानाच्या शौचालयात सिगारेट पेटवतात. त्यांना नंतर विमान लँड झाल्यावर अटक केली जाते; पण विमान उड्डाण करत असताना पेटलेली सिगारेट विझवण्यासाठी टॉयलेटमध्ये ॲशट्रे इन्स्टॉल केलेले असतात. एखादा प्रवासी विमानात धूम्रपान करताना पकडला गेल्यास त्याची सिगारेट कचऱ्याच्या डब्यात टाकली जात नाही. ही सिगारेट त्या ॲशट्रेमध्ये टाकली जाते. मागील काही काळात भारतामध्ये विमानात धूम्रपान करण्याच्या घटना घडल्या. कुवैतहून चेन्नईला येणाऱ्या 'एअर इंडिया'च्या विमानामध्ये धूम्रपान करणाऱ्या एका व्यक्तीला विमान चेन्नईमध्ये उतरताच अटक करण्यात आली. अशा प्रकारे विमानात धूम्रपान करण्याचा हा काही पहिलाच प्रकार नाही. या पूर्वी सुरत-कोलकाता विमानामध्ये बसल्यानंतर विमान टेक ऑफ करण्याच्या काही सेकंद आधी एका प्रवाशाने बिडी पेटवल्याने एकच गोंधळ उडालेला. या व्यक्तीला अटक करण्यात आली. अनेकदा अशा प्रकारे विमानामध्ये धूम्रपान करणाऱ्यांमुळे इतर प्रवासी अडचणीत येतात.



## या बेटांवर आहेत अनेक प्रतिबंध

जपानमध्ये ओकिनोशिमा नावाचं एक बेट आहे. महिलांना या बेटावर जाता येत नाही. तसंच पुरुषांनाही कडक नियमांचं पालन केल्यानंतरच या बेटावर सोडलं जातं. ओकिनोशिया बेटांना युनेस्कोतर्फे जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आलं आहे. हे बेट ७०० चौरस किलोमीटर परिसरात पसरलं आहे. हे बेट चौथ्या ते नवव्या शतकादरम्यान कोरियन बेटं आणि चीन यांच्यातल्या व्यापाराचं केंद्र असल्याचं म्हटलं जायचं. धार्मिक दृष्टिकोनातून या बेटाचं मोठं महत्त्व आहे. अनेक वर्षांपासून इथे धार्मिक प्रतिबंध घालण्यात आले आहेत. हे प्रतिबंध अजूनही टिकून आहेत. या प्रतिबंधांअंतर्गत महिलांना इथे प्रवेश दिला जात नाही. या बेटावर जाण्याआधी पुरुषांना निर्वस्त्र होऊन आंघोळ करावी लागते. वर्षभरात फक्त दोनशेच पुरुष या बेटावर जाऊ शकतात. या बेटावरून कोणीही काही घेऊन जाऊ शकत नाही. इथलं गवतही नेता येत नाही. इथल्या प्रवासाबद्दल कोणाला काहीच न सांगण्याचा सल्लाही दिला जातो. इथे मुनाकाता ताइशा ओकित्सु मंदिर आहे. हे समुद्राच्या देवीचं मंदिर आहे. याच कारणामुळे प्रवाशांवर अनेक प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

## श्रीमंती चोरी

आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेकजण चोरीच्या मार्गाला लागतात. गरिबी दूर करण्यासाठी हा मार्ग निवडला जातो. पण श्रीमंत माणसंच चोरीकडे वळली तर... लाखोंचा पगार घेणाऱ्या एका बँकेच्या अधिकाऱ्याने सँडविचची चोरी केली. लंडनमधल्या सीटी बँकेच्या मुख्य कार्यालयात अशी घटना घडली.

इथला एक बँकर बँकेच्या कँटिनमध्ये चोरी करताना पडकला गेला. तो सँडविच चोरत होता. विशेष म्हणजे हा साधासुधा कर्मचारी नव्हता. त्याचं वार्षिक उत्पन्न नऊ कोटी रुपये



म्हणजे एक दशलक्ष पाउंड इतकं होतं. महत्त्वाची बाब म्हणजे या बँकरचं नाव पारस शाह आहे. तो भारतीय वंशांचा बँक कर्मचारी होतं. पारस शाह यांच्यावर बऱ्याच जबाबदाऱ्या होत्या. त्यांना सँडविच चोरताना पहिल्यांदाच पकडण्यात आलं. त्यांनी याआधीही कँटिनमधून अन्न चोरल्याची शक्यता वर्तवण्यात आली. सँडविच चोरल्याच्या कारणामुळे त्यांना गलेलट्ठ पगाराच्या या नोकरीवरून काढून टाकण्यात आलं.

# संघाने महात्मा गांधींचे विचार स्वीकारावे : सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :
सरसंघचालकांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्या समोर उभे राहून



स्वंयसेवकांचे पथसंचनाचे अवलोकन करणे ठीक आहे पण त्यांनी गांधीचे विचार स्वीकारावे नाही तर पुढे गांधी आणि मागे नथुराम असे असायला नको, त्यांना नथुराम गोडसे, चालतो, त्यांनी बुरसेटलेला विचार सोडावा.. मनुस्मृती दहन करावे, आम्ही त्यांचं स्वागत करू, असे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नागपूर येथे पत्रकार परिषदेत म्हणाले.

काँग्रेसच्या मशाल यात्रेनिमित्त सपकाळ रविवारी नागपूरमध्ये आले होते. आमदार अभिजत वंजारी यांच्या पदवीधर मतदारसंघ नोंदणी कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यानंतर गिरीश पांडव यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. शनिवारी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या पथसंचलनाचे अवलोकन सरसंघचालक डॉ. मोहन भागव यांनी बर्डीतील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजळ उभे राहून केले.

यासंदर्भात सपकाळ म्हणाले, सरसंघचालकांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्या समोर उभे राहून स्वंयसेवकांचे पथसंचनाचे अवलोकन करणे ठीक आहे पण त्यांनी गांधीचे विचार स्वीकारावे नाही तर पुढे गांधी आणि मागे नथुराम असे असायला नको, त्यांना नथुराम गोडसे, चालतो, त्यांनी बुरसेटलेला विचार सोडावा.. मनुस्मृती दहन करावे, आम्ही त्यांचं स्वागत करू.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिल्ली वारी ही शेतकऱ्यासाठी केंद्राकडून मदत आणण्यासाठी नव्हती तर ते सूरजागडच्या (गडचिरोली) प्रकल्पासाठी ना हरकत प्रमामपत्र घेण्यासाठी गेले होते. तेथून ते हात हलवत परत आले, असे सपकाळ म्हणाले. शेतकरी अडचणीत आहे त्यांना मदत करणे आवश्यक आहे मात्र हे सरकार मदत करताना दिसत नाही शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी मदत करावी. अन्यथा आम्ही शेतकऱ्यांसाठी आंदोलन करू ,असा इशारा त्यांनी दिला. सोमवारी नागपूरच्या दीक्षाभूमी पासून सेवाग्राम पर्यंत पदयात्रा काढणारअसून तुषार गांधी नेतृत्व करणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ओबीसींच्या आरक्षणासंदर्भात पंकजा मुंडे मंत्रिमंडळाच्या बैठकीत का बोलत नाही? असा सवाल त्यांनी केला.

# सांगीतिक प्रार्थनेमुळे नवीन लोक संघाकडे आकर्षित होतील

## मोहन भागवत यांचे प्रतिपादन : सरसंघचालकांच्या हस्ते संघ प्रार्थना ध्वनीफितीचे विमोचन





■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :
संस्कृतमधील संघ प्रार्थनेला चाल लावून ताल, सूर आणि लयीत गायले आहे. त्याचे आठ भाषांमध्ये अर्थासह निवेदनही करण्यात आले आहे. ही प्रार्थना जितक्या जास्त लोकांपर्यत पोहचेल तितके नवीन लोक संघाकडे आकर्षीत होतील असे प्रतिपादन सरसंघचालक मोहन भागवत यांनी येथे केले.

पुण्यातील शिवाजी नगर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि चितळे समूहाचे संचालक इंद्रनील चितळे यांची निर्मिती असलेल्या "अर्थासहीत संघ प्रार्थना' या ध्वनीफितीचे विमोचन सरसंघचाकांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. रेशिमबागेतील महर्षि व्यास सभागृहात आयोजित कार्यक्रमाला ध्वनीफितीशी संबंधित सर्व जण उपस्थित होते.

शब्द, अर्थ आणि भाव या तिन्हीला अनुरूप संगीत असा योग या निमित्ताने जुळून आला आहे. प्रार्थना म्हणण्याने ती कानातून बुद्धीत आणि बुद्धीतून मनात जाते. पण, संगीतामुळे प्रार्थना कानातून सरळ मनात उतरते. म्हणून गीते परिणामकारक असतात असे सरसंघचालक म्हणाले. पहिल्या टप्प्यात हिंदी, मराठी, गुजराथी, इंग्रजी, तमीळ, तेलुगु, कन्नड व मल्याळम या भाषांमध्ये प्रार्थनेच्या अथार्चे निवेदन केले आहे. संगीतकार राहुल रानडे यांनी संगीत दिले असून ख्यातनाम गायन शंकर महादेवन यांनी गायन केले आहे. मराठी अर्थ विवेक आपटे यांनी लिहिला असून निवेदन अभिनेता सचिन खेडेकर यांचे आहे. हिंदीत हरिश भीमानी यांनी आवाज दिला आहे.

यावेळी बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी संघाची प्रार्थना हा सामुहिक संकल्प असल्याचे सांगितले. स्वयंसेवक रोज त्याची आठवण करतात. सगळे मिळून काय करायचे ठरवले आहे ते प्रार्थनेत आहे. भारत मातेला काहीही मागायचे नाही. तर तिच्याकरता द्यायचे आहे. मागायचे आहे ते परमेश्वराकडे मागितले आहे.

१९३९ पासून आजपर्यंत स्वयंसेवक रोज संघ प्रार्थनेचे उच्चारण करतात. इतक्या वर्षाच्या साधनेतून प्रार्थनेला मंत्राचे सामर्थ्य लाभलेले आहे. त्यातून स्वयंसेवक पक्का होतो.

शब्द आणि अर्थाच्या पलिकडे जावून प्रार्थना हा भाव आहे. सुरूवातीला मराठी, हिंदीत प्रार्थना होती. संपूर्ण भारतात चालणारी भाषा संस्कृत होती. म्हणून संस्कृतमध्ये केली. संकल्पाची दृढता, मातृभूमीप्रती भक्ती, प्रेम आणि समर्पण प्रार्थनेत आहे. शब्दातून अर्थाकडे आणि अथार्तून भावाकडे प्रवाह व्हावा लागतो. संघाचा हा प्रवाह संघाच्या गतीने सुरू आहे. काहींना तो संथही वाटु शकतो, अव्सेही ते म्हणाले.

# औद्योगिक विकासामुळे समृद्ध अर्थव्यवस्था



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २८ :
जिल्ह्यात खनिज विकास निधीतून अनेक मोठे उपक्रम राबविण्यात येत आहे. यात टाटा ट्रस्टच्या माध्यमातून कॅन्सर हॉस्पिटल, कौशल्यावर आधारित रोजगार, आरोग्य, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचा समावेश आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर आणि गडचिरोली मध्ये इंडस्ट्रियल मॅग्नेट तयार होत आहे. त्यामुळे दीड लक्ष लोकांना रोजगार मिळणार आहे. तसेच स्थानिकांनाच शंभर टक्के काम दिले जाणार आहे. औद्योगिक विकासामुळेच समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होणार आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुल (जि. चंद्रपूर) येथील विश्रामगृहात, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे अनावरण करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, आमदार सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोहन ठवरे व इतर अधिकारी उपस्थित होते.

ज्या ठिकाणी उत्खनन होते, तेथील नागरिकांना खनिज निधीचा फायदा झाला पाहिजे, अशी संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, खनिज उत्खनन आणि वाहतुकीमुळे जो त्रास स्थानिकांना होतो. त्यामुळे सर्वात जास्त वाटा स्थानिक लोकांनाच मिळाला पाहिजे. चंद्रपूर जिल्ह्याने खनिज क्षेत्रात अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. विशेष म्हणजे खनिज विकास निधीमधून रोजगार निर्मिती, आरोग्य, विकास, शिक्षण, कौशल्य आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्यात अतिशय चांगल्या पद्धतीने राबविण्यात येत आहे.

चंद्रपूर आणि गडचिरोली हा परिसर इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होत आहे. त्यामुळे दीड लक्ष लोकांना रोजगार मिळणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखून हा विकास आपल्याला करायचा आहे. औद्योगिकरणासोबतच चंद्रपूरने पर्यावरण संतुलन राखले, असा संदेश गेला पाहिजे. कौशल्य विकास आणि रोजगारावर भर देऊन १०० टक्के स्थानिकांना रोजगार मिळेल, अशी व्यवस्था आपण उभी करणार आहोत.

गतकाळात आपण ५० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वीरीत्या राबवली. यावेळी सुद्धा चंद्रपूरने वृक्ष लागवडीचे मोठे उद्दिष्ट गाठावे. संपूर्ण भारतात केवळ महाराष्ट्र राज्याने ग्रीन कव्हर वाढवले असून आपला परिसर नैसर्गिक समृद्ध आहे. मात्र आता आपल्याला संपूर्ण महाराष्ट्राचे वनक्षेत्र ३३ टक्क्यांच्या वर नेण्याकरिता करिता विशेष लक्ष द्यायचे आहे. चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने खनिज विकास निधीतून अतिशय चांगले काम केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी तर आभार जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी मानले.

### राज्यातील पूरग्रस्तांना दोन हजार कोटीची मदत

राज्यातील आठ ते दहा जिल्ह्यांना अतिवृष्टी व पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. त्यामुळे पूरग्रस्तांसाठी तातडीने २ हजार कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. तसेच प्रभावित कुटुंबांना तात्काळ १० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जिल्हाधिकारी आणि प्रशासनातील अधिकारी प्रत्यक्ष फिल्डवर उतरून परिस्थितीचा आढावा घेत आहेत. पुढचे दोन ते तीन दिवस अलर्ट मोडवर राहून काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज रविवार २८ सप्टेंबर रोजी कौटुंबिक कामासाठी मूल येथे आले असता माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पूर परिस्थितीवर पूर्ण लक्ष असल्याची आणि पूरग्रस्तांना तातडीने मदत केली जात असल्याची माहिती दिली.



■ नागपूर : हेमू कॉलनी, जरीपटका, नागपूर येथील माँ दुर्गा देवीची ही आकर्षक मूर्ती. नवरात्रोत्सवात येथे भाविकांची मोठी गर्दी उसळत आहे.

# खडकपुर्णाचे १९ दरवाजे उघडले

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २८ :
: जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसाने जिल्ह्यातील बहुतेक लहान, मध्यम धरणे तुडूंब भरली असून त्यातून विसर्ग वाहत आहे.खडकपूर्णा व पेनटाकळी या मोठ्या धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहे. नदी पात्रात मोठा विसर्ग सोडण्यात येत असल्याने नदिकाठाच्या पन्नास गावांना पुराचा फटका बसला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ३ पैकी २ मोठे प्रकल्प ओव्हर फ्लो झाले आहे.
संत चोखासागर अर्थात खडकपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात आज रविवारी देखील मुसळधार पवसाची मुख्यता जालना जिल्ह्यातील भोकरदन, जाफ्राबाद व छत्रपती संभाजीनगर सिल्लोड या क्षेत्रात मुसळधार पाऊसाची शक्यता सांगितली आहे.

# वंचितची युतीसाठी तयारी.... काँग्रेसचा प्रतिसाद नाही!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांव्यतिरिक्त इतर कोणत्याही पक्षासोबत युती करण्याची आपली तयारी असल्याची घोषणा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काही महिन्यांपूर्वी केली होती. मात्र, काँग्रेस आणि इतर कोणत्याही पक्षाने अद्याप युतीसाठी संपर्क साधलेला नसल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहे. भाजपने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीशी युती करू नये, असे सांगितले आहे का? अशी शंका प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.

वंचित बहुजन आघाडीने आतापर्यंत अनेक निवडणुकांमध्ये स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपविरोधात एकत्र येण्याची तयारी प्रकाश आंबेडकर यांनी वारंवार दर्शवली आहे. त्यावरही काँग्रेसकडून ठोस प्रतिसाद न मिळाल्याने आंबेडकरांनी आता थेट प्रश्न उपस्थित करून काँग्रेसच्या भूमिकेवर टीका केली आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

प्रकाश आंबेडकरांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप आणि त्याचे मित्रपक्ष सोडून इतर पक्षांसोबत युती करायला आम्ही तयार आहोत! हे मी २१ मे रोजी सांगितले होते आणि माझी पत्नी अंजली आंबेडकर यांनी सुद्धा १८ जून रोजी तेच सांगितले होते. पण, आजपर्यंत काँग्रेस किंवा इतर कोणत्याही पक्षाने वंचित बहुजन आघाडीशी युतीसाठी संपर्क साधलेला नाही.

### भाजपच्या दबावामुळे काँग्रेस सोबत येत नाही का?
### प्रकाश आंबेडकरांचा सवाल



प्रकाश आंबेडकर यांनी संशय व्यक्त करत थेट भाजपवर निशाणा साधला आहे. भाजपने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीशी युती करू नये, असे सांगितले आहे का? असा थेट सवाल त्यांनी विचारला. तसेच भाजपकडे काँग्रेसविषयी असं काय आहे, ज्यामुळे काँग्रेस भाजपला घाबरत आहे? असाही सवाल वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

**काँग्रेस वंचितशी युती करणार का?**
दरम्यान, राज्यात भाजपविरोधी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच वंचित बहुजन आघाडीची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. विशेषतः दलित, ओबीसी आणि वंचित घटकांचा प्रभाव असलेल्या मतदारसंघांमध्ये आघाडीचे गणित काँग्रेससाठी निर्णायक ठरू शकते. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनी आज उपस्थित केलेल्या शंकेनंतर आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत भाजपला रोखण्यासाठी वंचित बहुजन आघाडीसोबत हातमिळवणी करण्याची तयारी काँग्रेस दाखवते का? हे आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पत्रकारांच्या मुलांसाठी व्हॉईस ऑफ मीडियाचा पुढाकार

## राज्यातील सर्व जिल्ह्यांत राबविला अनोखा उपक्रम : मागणी केलेल्या प्रत्येकाला शैक्षणिक मदत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:
व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही. ओ. एम. इंटरनॅशनल फोरमह्ने राज्यभरातील पत्रकारांच्या मुलांच्या शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी मोठा पुढाकार घेतला आहे. राज्यातील मागणी असणाऱ्या सर्व जिल्ह्यांत शैक्षणिक किट, समुपदेशन, प्रवेश प्रक्रियेविषयी मार्गदर्शन, शैक्षणिक साहित्य आदीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. अगोदर महाराष्ट्र आणि मग भारतातील सर्व राज्य अशा टप्प्याटप्प्याने या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



एका खास कार्यक्रमाचे आयोजन करून व्हॉईस ऑफ मीडियाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शैक्षणिक किट वाटपाचा शुभारंभ मुंबईतील रेडिओ क्लब येथे करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही. ओ. एम. इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्यासह संस्थेचे प्रमुख चंद्रमोहन पुप्पाला, शंतनू डोईफोडे, दिव्या भोसले, चेतन बंडेवार, परवेज खान, गोरक्षनाथ मदने, शिवाजी गावंडे, किशोर कारंजेकर, नरेंद्र देशमुख, गगन महोत्रा, व्यंकटेश जोशी उपस्थित होते.

जगभर पत्रकार आणि पत्रकारितेसाठी व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही. ओ. एम. इंटरनॅशनल फोरमने क्रांती घडवली आहे. आज या संस्था जगातील तब्बल ५६ देशांपर्यंत पोहोचल्या असून ५ लाख ७० हजार पत्रकार या संस्थेमध्ये पूर्ण वेळ काम करतात.

व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही. ओ. एम. इंटरनॅशनल फोरम हे केवळ पत्रकारांसाठी सामाजिक आंदोलन नसून एक भव्य व्यासपीठ बनले आहे. पत्रकारांचे अनेक प्रश्न सोडवण्यासोबतच पत्रकारितेला सुधारण्याचे, सामाजिक ढाच्यात बसवण्याचे कामही सातत्याने करण्यात आले आहे.
संस्थेच्या वतीने जी पंचसूत्री हाती घेतली आहे त्यामध्ये पत्रकारांच्या मुलांचे शिक्षण हा एक महत्त्वाची पंचसूत्री आहे. या पंचसूत्रीप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये असलेल्या आणि शिक्षणासाठी मागणी केलेल्या पत्रकारांच्या पाल्यांसाठी एज्युकेशन किट वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. या किट्स अन्नामृत फाउंडेशन मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गंभीरे व रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअरच्या अध्यक्षा श्रीमती नूपूर देसाई यांच्या सहकायाने दिल्या गेल्या.

गोरक्षनाथ गंभीरे म्हणाले, पत्रकार समाजाच्या असंख्य समस्या समाजासमोर आणतो. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आपण किमान एवढा हातभार लावू शकतो याचा आम्हाला अभिमान आहे. शिक्षण हीच खरी गुंतवणूक असून व्हॉईस ऑफ मीडियाह्सारख्या संस्थांनी हा उपक्रम राबवून देशात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. अन्नामृत फाउंडेशन नेहमीच अशा उपक्रमांसोबत खांद्याला खांदा लावून उभे राहील.

श्रीमती नूपूर देसाई म्हणाल्या, पत्रकारांच्या मुलांसाठी हा उपक्रम म्हणजे केवळ शैक्षणिक किट नव्हे तर त्यांच्या भविष्याचा आधार आहे. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पिअरला अशा उपक्रमाचा भाग होण्याचा सन्मान मिळतो आहे. शिक्षणाद्वारे समाज परिवर्तन घडते आणि पत्रकारांच्या मुलांना हाच बदल घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असा आमचा विश्वास आहे.

व्हॉईस ऑफ मीडियाचे महासचिव चंद्रमोहन पुप्पाला म्हणाले, व्हॉईस ऑफ मीडिया ही केवळ पत्रकारांसाठी आवाज देणारी संस्था नसून त्यांच्या कुटुंबासाठीही एक सुरक्षा कवच आहे. महाराष्ट्रात सुरू झालेला हा उपक्रम लवकरच देशभर राबविण्यात येईल. पत्रकारांच्या मुलांना शिक्षणाची आणि संधीची हमी हा आमचा नवा संकल्प आहे आणि तो पूर्ण होईपर्यंत ही मोहीम थांबणार नाही.

महाराष्ट्रानंतर देशातील सर्व राज्यात किट वाटपाचा उपक्रम हाती घेतला जाणार आहे, अशी माहिती यावेळी संदीप काळे यांनी दिली. या कार्यक्रमाला व्हाईस ऑफ मीडियाचे महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.